मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

दैनिक तरुणांचा बुलंद आवाज मराठी

# युवक आधार

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले




● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : २६२ ■ शुक्रवार, ०५ जून २०२६ ■ किंमत : २ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514

## साखर कारखान्याला आता १०० टक्के ‘बैल-मुक्त’ प्रमाणपत्र

### आता बैलांऐवजी ट्रॅक्टरने होणार उसाची वाहतूक



**सोलापूर :** महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यातील एका साखर कारखान्याने आपल्या दैनंदिन कामकाजात बैलांचा वापर पूर्णपणे बंद केला आहे. या निर्णयाची दखल घेत प्राण्यांच्या हक्कांसाठी काम करणाऱ्या एका प्रमुख संस्थेने या कारखान्याला ‘१०० टक्के बैल-मुक्त प्रमाणपत्र’ प्रदान केले आहे. उसाने भरलेल्या गाड्या ओढण्यासारख्या कष्टाच्या कामांसाठी बैलांचा वापर पूर्णपणे थांबवणाऱ्या साखर कारखान्यांनाच हे प्रमाणपत्र दिले जाते. सोलापूर जिल्ह्यातील अचेगाव येथे स्थित असलेल्या ‘जय हिंद शुगर प्रा. लि.’ या कारखान्याला, ‘पेटा इंडिया’ या संस्थेकडून हे प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे.‘पेटा’ने जारी केलेल्या एका निवेदनात, या ‘बैल-मुक्त’ प्रमाणपत्राचे वर्णन एक अनोखा उपक्रम असे करण्यात आले आहे. हा उपक्रम अशा साखर कारखान्यांच्या प्रयत्नांचे कौतुक करतो, ज्यांनी आपल्या सर्व कामकाजातून बैलांच्या श्रमाचा वापर पूर्णपणे वगळला आहे. या निवेदनानुसार, हा उपक्रम असा संकेत देतो की, भारतातील तसेच परदेशातील उसाचे खरेदीदार आता अशा पुरवठा साखळ्यांना प्राधान्य देत आहेत, ज्या पूर्णपणे यांत्रिक (मशिन-आधारित) आहेत आणि ज्यामध्ये प्राण्यांचा वापर केला जात नाही. या बदलामागील मुख्य उद्देश प्राण्यांचे कल्याण हाच आहे.

# केरळमध्ये मान्सून दाखल

मुंबई: उकाड्याने त्रस्त झालेल्या मुंबईकरांसाठी दिलासादायक बातमी आहे. नैऋत्य मोसमी वाऱ्यांचे गुरुवारी केरळमध्ये अधिकृत आगमन झाले आहे. केरळमध्ये मान्सूनचे आगमन झाल्याने आता मुंबईकरांसह राज्यातील सामान्य नागरिकांच्या अन् बळीराजाच्या नजरा त्याच्या पुढील प्रवासाकडे लागल्या आहेत.

**मुंबईत मान्सून कधी दाखल होणार?**

साधारणपणे मान्सून १ जूनच्या आसपास केरळमध्ये पोहोचतो. मात्र यंदा केरळमध्ये त्याचे आगमन सुमारे तीन दिवस उशिराने झाले आहे. केरळमध्ये मान्सून दाखल झाल्यानंतर त्याची पुढील वाटचाल सामान्य



राहिल्यास १४ जूनच्या सुमारास मुंबईत मान्सूनचे आगमन होण्याची शक्यता आहे, अशी माहिती भारतीय हवामान विभागाच्या मुंबई प्रादेशिक केंद्राचे संचालक बिक्रम सिंग यांनी दिली.

साधारणपणे मुंबईत मान्सून दाखल होण्याची अधिकृत तारीख ११ जून असते. मात्र, १ जून रोजी केरळमध्ये मान्सून आल्यानंतर मुंबईपर्यंत पोहोचण्यासाठी त्याला सुमारे १० दिवसांचा काळ लागतो, त्यामुळे यंदा १४ जूनपर्यंत मान्सून मुंबईत धडकेल, असा अंदाज सिंग यांनी वर्तवला.सध्या दक्षिण भारतात मान्सूनच्या आगमनासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण झाली आहे. गेल्या दोन आठवड्यांत अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागरातील प्रतिकूल हवामान प्रणाली, तसेच केरळ, कर्नाटक आणि लक्षद्वीप बेटांवर सलग पाऊस न झाल्यामुळे मान्सूनची प्रगती काहीशी रखडली होती.**महाराष्ट्रात पुढील २ दिवसांत मान्सूनचे आगमन?**

केरळमध्ये आगमन झाल्यानंतर आता ६ ते ७ तारखेला मान्सून तळकोकणात दाखल होण्याची शक्यताही काही रिपोर्ट्समध्ये वर्तवण्यात आली असून त्यानंतर मुंबई, कोकण, पश्चिम महाराष्ट्रासह इतर भागात पावसाला सुरुवात होऊ शकते. पुढील दोन ते तीन दिवसांत मोसमी पाऊस गोव्याच्या संपूर्ण भागात, महाराष्ट्राच्या काही भागांत तसेच आंध्र प्रदेश, कर्नाटक आणि ईशान्य भारतातील काही राज्यांमध्ये पुढे सरकण्याची शक्यता भारतीय हवामान विभागाने वर्तविली आहे.

**केरळमध्ये मुसळधार पावसाचा इशारा**

मान्सून दाखल झाल्यानंतर केरळमध्ये पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. अलप्पुझा, कोट्टायम आणि एर्नाकुलम जिल्ह्यांसाठी हवामान विभागाने ऑरेंज अलर्ट जारी केला असून काही भागांत मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

**मुंबई, ठाणे आणि पालघरमध्ये पावसाची शक्यता**

दरम्यान, मुंबई, ठाणे आणि पालघर परिसरात ७ जूनपर्यंत ढगाळ वातावरण राहण्याचा अंदाज आहे . काही ठिकाणी मेघगर्जनेसह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडू शकतो . तसेच वाऱ्याचा वेगही वाढण्याची शक्यता आहे .

## नागपुरमध्ये JCI इंडियाच्या ध्येय-धोरणांवर आणि युवा नेतृत्वावर पत्रकार परिषद"

**दैनिक युवक आधार**

**नागपूर प्रतिनिधी राकेश यादव** : युवा नेतृत्व, समाजसेवा आणि राष्ट्रनिर्माणाच्या क्षेत्रात कार्यरत असलेल्या JCI इंडियाचे ध्येय, दृष्टीकोन आणि सामाजिक योगदान जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने JCI नागपूर कलर्सतर्फे पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले. यावेळी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी JCI च्या विविध उपक्रमांची, उद्दिष्टांची आणि युवा सक्षमीकरणासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांची माहिती दिली.

JCI नागपूर कलर्सच्या २०२६ च्या अध्यक्षा जेसी अश्विनी चोपकर यांनी सांगितले की, JCI ही केवळ संस्था नसून नेतृत्व विकास, व्यक्तिमत्त्व घडविणे, समाजसेवा, प्रशिक्षण आणि




राष्ट्रनिर्माणासाठी कार्य करणारे एक प्रभावी जागतिक व्यासपीठ आहे. गेल्या आठ वर्षांपासून JCI नागपूर कलर्स समाजसेवा, नेतृत्व विकास आणि सामुदायिक उन्नतीच्या क्षेत्रात सातत्याने कार्यरत असून विविध प्रकल्प आणि प्रशिक्षण कार्यक्रमांच्या माध्यमातून समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्याचा प्रयत्न करत आहे. यावेळी JCI इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष भरत एन. आचार्य यांनी JCI इंडियाला युवा नेतृत्व, सेवा आणि राष्ट्रनिर्माणासाठी कार्य करणारी एक प्रभावी चळवळ संबोधले. समाज, शहर आणि राष्ट्राच्या भविष्याला नवी दिशा देणारे परिवर्तनशील नेते घडविणे हे संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले. आजचा युवा हा केवळ उद्याचा नेता नसून आजचाच परिवर्तनकर्ता असल्याचेही त्यांनी नमूद केले.संस्थेच्या "Lead • Connect • Evolve" या संकल्पनेविषयी बोलताना त्यांनी सांगितले की, ही केवळ थीम नसून तरुणांना नेतृत्व, विकास आणि जागतिक ओळख मिळवून देणारी प्रेरणादायी वाटचाल आहे. JCI अशा नेत्यांची जडणघडण करते जे आव्हानांचे संधींमध्ये रूपांतर करून समाजात शाश्वत सकारात्मक बदल घडवून आणतात.पत्रकार परिषदेत संस्थेच्या सातत्यपूर्ण यशामध्ये योगदान देणाऱ्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांचाही गौरव करण्यात आला. यामध्ये डॉ. ईशा अग्रवाल (IPP), रेणुका वर्मा (संस्थापक अध्यक्षा), पल्लवी घाटे (LO Officer), आरती मित्तल (झोन अध्यक्ष) आणि राजेश सराफ (माजी राष्ट्रीय उपाध्यक्ष, JCI इंडिया) यांच्या योगदानाचा विशेष उल्लेख करण्यात आला.

## माजी सरपंच नंदकुमार म्हात्रे यांच्या पाठपुराव्याने रोहिंजन परिसरातील गटारांची साफसफाई

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** रोहिंजन ग्रामपंचायतीचे माजी सरपंच आणि पनवेल तालुका ओबीसी सेलचे अध्यक्ष नंदकुमार म्हात्रे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याने प्रभाग एकमधील रोहिंजन गावलगत विजय पाटील यांच्या घराजवळील व टुडे आनंदम सोसायटी जवळील गटारांची साफसफाई करण्यात आली. यावेळी माजी सरपंच नंदकुमार म्हात्रे, महानगरपालिकेचे कर्मचारी, तसेच सुरेश पोरजी, विजय पाटील, नेहाल ठाकूर, उमेश मढवी व इतर ग्रामस्थ उपस्थित होते. म्हात्रे यांच्या प्रयत्नांना यश येत महानगरपालिका प्रशासनाने तातडीने कार्यवाही करत संबंधित गटारांची साफसफाई केली. यामुळे परिसरातील साचलेल्या पाण्याचा निचरा होण्यास मदत झाली असून नागरिकांना दिलासा मिळाला आहे. विशेषतः पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर गटारांची स्वच्छता झाल्याने डासांची उत्पत्ती, दुर्गंधी तसेच आरोग्यविषयक समस्या कमी होण्यास मदत होणार आहे.याप्रसंगी नंदकुमार म्हात्रे



यांनी सांगितले की, “परिसरातील नागरिकांच्या मूलभूत सुविधांशी संबंधित प्रश्न सोडविण्यासाठी आपण नेहमीच कटिबद्ध आहोत. नागरिकांच्या अडचणी प्रशासनापर्यंत पोहोचवून त्यांचे निराकरण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू राहतील.”रोहिंजन परिसरातील स्वच्छता, आरोग्य आणि नागरिकांच्या सोयीसाठी अशा प्रकारच्या कामांना पुढेही प्राधान्य देण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

## टोल विरोधात चैतन्य उषा यांचा पक्ष विरहित जनतेचा खरा लढा - साहित्यरत्न प्रा.एल.बी.पाटील

**दैनिक युवक आधार**

**उरण प्रतिनिधी सागर घरत** : पनवेल ते गोवा या कोकण मार्गावर सरकारकडून जागोजागी टोल नाके उभारून जाचक असे टोल कराची वसुली करून जनतेला आजमितीला रस्ते पूर्णपणे दुरुस्त न होता कर वसुली करिता असल्याने काही राजकीय पक्षांनी काही नाक्यांवर दिखाऊ निषेध आंदोलने करण्याचा प्रयत्न केला आहे.परंतु मागील पाच सहा महिन्यांच्या आधीपासून पनवेल पासून गोवा कोकण सिमेपर्यंत स्वत पायी चालत जाऊन होत असलेल्या रस्ता कामाचे यथोचित अभ्यास करून सरकारी कार्यालयात झालेल्या कामांतील चुकांबाबत आणि राहिलेल्या कमतरतेबाबत



वारंवार अहवाल पोहोचवून आणि चर्चा करून सनदशीर शांत आंदोलने चालूच ठेवली आहेत. ती चालू ठेवणारे चैतन्य उषा लक्ष्मण पाटील यांनी हा पक्ष विरहित जनतेचा खरा लढा चालू ठेवला आहे. वरवणे पेण येथे गुंजार पाटील यांच्या पुस्तक प्रकाशन मोठ्या समारंभात ," साहित्यिक आणि जनतेने सनदशीर मार्गाने

रस्ते परिपूर्ण होण्यासाठी टोल वसुली गैर असून त्या विरोधात लढे करायला हवेत," हे विचार मांडल्यावर आगरी साहित्यरत्न रायगडभूषण प्रा.एल.बी पाटील यांनी ," चैतन्य उषा यांचा विचार काही राजकीय पक्षापेक्षा वेगळा असून सनदशीर मार्गी खरा आहे.त्याला कवी लेखक नक्कीच पाठिंबा देतील ,"असे स्पष्ट ही केले.चैतन्य उषा यांनी चार दिवसांपूर्वी खारपाडा टोल नाका येथे सुप्रसिद्ध कवयित्री अक्षता गोसावी आणि सुप्रसिद्ध कवी संजीव पाटील यांच्या कविता मधून सरकारच्या विरोधातील कवितांनी लढ्याला आक्रमक धार दिली आहे." जनतेला आज सनदशीर लढ्याची आणि निस्वार्थी लढ्यात कवी लेखक उतरविण्यासाठी मी आग्रही राहून सहभागी होईन. "असेही मत प्रा.एल.बी यांनी आमच्या प्रतिनिधीपुढे मांडले.

## महापौर नितीन पाटील यांनी प्रभाग १४ मधील नालेसफाई व पावसाळ्यापूर्वीच्या कामांची पाहणी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील यांनी आज (दि. ४ जून) प्रभाग क्रमांक १४ मधील विविध ठिकाणी नालेसफाई व पावसाळ्यापूर्वी सुरू असलेल्या कामांची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी परिसरातील नागरिकांच्या समस्या जाणून घेत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरातील सखल भागांमध्ये पाणी साचू नये, नागरिकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये तसेच नाल्यांमधील गाळ व अडथळे तातडीने दूर करण्यात यावेत, यासाठी महापौरांनी अधिकाऱ्यांना निर्देश दिले. विविध ठिकाणी



सुरू असलेल्या नालेसफाईच्या कामांचा आढावा घेत कामांची गुणवत्ता आणि गती यावरही त्यांनी भर दिला.प्रभागातील विकासकामे वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण व्हावीत यासाठी भाजपाचे चारही उमेदवार सातत्याने पाठपुरावा करत येत असून नागरिकांच्या सुरक्षिततेला आणि सुविधांना सर्वोच्च प्राधान्य दिले जात असल्याचे महापौर नितीन पाटील यांनी यावेळी सांगितले. या पाहणी दौऱ्यावेळी पनवेल भाजपा ओबीसी सेल अध्यक्ष सतिश पाटील, माजी नगरसेवक गणपत म्हात्रे, माजी नगरसेविका हेमलता म्हात्रे, भाजपा पनवेल मंडल सरचिटणीस रुपेश नागवेकर, उपाध्यक्ष अतुल भगत, प्रभाग अध्यक्ष गणेश म्हात्रे, भाजपा नेते शैलेश म्हात्रे, रोहीत आठवणे, रुपेश आंबोलकर, अभिजित जाधव, सचिन गमरे, युवा मोर्चा अध्यक्ष कुणाल पाटील व स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते, महानगरपालिका अधिकारी तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. भाजपा उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष श्री. मयुरेश नेतकर यांनी सांगितले कि, प्रभाग १४ मधील नागरिकांना पावसाळ्यात कोणत्याही अडचणींचा सामना करावा लागू नये यासाठी महापौर नितीनभाई पाटील यांच्या नेतृत्वाखाली सातत्याने पाठपुरावा केला जात आहे. प्रत्येक प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी भारतीय जनता पक्ष सदैव जनतेसोबत उभा आहे.

# वंचित बहुजन आघाडीच्या मागणीची प्रशासनाने घेतली दखल

## बोगस पाणंद रस्ता प्रकरणी चौकशी समिती स्थापन

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी ) -** पाटोदा तालुक्यातील कथित बोगस पाणंद रस्ता कामांच्या चौकशीसाठी वंचित बहुजन आघाडीने केलेल्या पाठपुराव्याला यश मिळाले असून, पंचायत समिती पाटोदाने या प्रकरणाची गंभीर दखल घेत चौकशी समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष सचिन मेघडंबर व तालुकाध्यक्ष बाळासाहेब गायकवाड यांनी दिनांक २९ मे २०२६ रोजी पाटोदा पंचायत समितीकडे निवेदन देऊन तालुक्यातील पाणंद रस्ता कामांमध्ये झालेल्या कथित अनियमिततेची सखोल चौकशी करण्याची मागणी केली होती. या मागणीची दखल घेत पाटोदा पंचायत समितीने दिनांक ०३ जून २०२६ रोजी पत्राद्वारे चौकशी समिती स्थापन करण्यात आल्याची माहिती दिली आहे. गट विकास अधिकारी यू.एम.सानप यांनी दिलेल्या पत्रानुसार, चौकशी समिती मार्फत संबंधित प्रकरणाची तपासणी करून कार्यवाहीचा अहवाल तात्काळ उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच गुरुवार ४ जून २०२६ रोजी प्रस्तावित



आंदोलन मागे घेऊन प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन ही करण्यात आले आहे. दरम्यान, वंचित बहुजन आघाडी पाटोदा यांच्या आंदोलनाची प्रशासनाने दखल घेतल्याने तालुक्यातील पाणंद रस्ता कामांबाबतचे वास्तव समोर येण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. चौकशी अहवालानंतर संबंधितांवर काय कारवाई होते, या कडे तालुकावासियांचे लक्ष लागले आहे. वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी प्रशासनाच्या या निर्णयाचे स्वागत केले असून, चौकशी निष्पक्ष व पारदर्शक पद्धतीने होऊन दोषींवर कठोर कारवाई व्हावी अशी मागणी केली आहे.

# आ. विनोद अग्रवाल यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

## रक्तदान शिबिर, साहित्य वाटप व दिव्यांगांना ट्रायसायकलचे वितरण

**दैनिक युवक आधार**

**गोंदिया सचिन बन्सोड जिल्हा प्रतिनिधी :** गोंदिया विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार विनोद अग्रवाल यांचा वाढदिवस आज मोठ्या उत्साहात आणि समाजोपयोगी उपक्रमांनी साजरा करण्यात आला. वाढदिवसानिमित्त आयोजित विविध कार्यक्रमांमधून सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडले.

गोंदिया शहरातील फुलचूर रोड येथील जलाराम लॉन येथे आयोजित कार्यक्रमाला मतदारसंघातील नागरिक, कार्यकर्ते, विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी, व्यापारी, उद्योजक तसेच विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वाढदिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमांमध्ये रक्तदान शिबिर, गरजू नागरिकांना आवश्यक साहित्याचे वितरण तसेच दिव्यांग बांधवांना ट्रायसायकलचे वाटप करण्यात आले. समाजातील दुर्बल घटकांप्रती संवेदनशीलता जपत आमदार



विनोद अग्रवाल यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून अनेक समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आले. रक्तदान शिबिरात युवकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून मोठ्या प्रमाणात रक्तदान केले.

यावेळी गोंदिया विधानसभा क्षेत्रातील नागरिकांनी आमदार विनोद अग्रवाल यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत त्यांच्यावर असलेला विश्वास आणि प्रेम व्यक्त केले. सकाळपासूनच शुभेच्छुकांची जलाराम लॉन येथे गर्दी पाहायला मिळाली. विविध संस्था, संघटना, व्यापारी संघ, सामाजिक कार्यकर्ते तसेच भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले आणि त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमादरम्यान अनेक मान्यवरांनी आमदार अग्रवाल यांच्या विकासाभिमुख कार्याचा गौरव केला. गोंदिया विधानसभा क्षेत्रात रस्ते, पाणीपुरवठा, शिक्षण, आरोग्य तसेच विविध विकासकामांच्या माध्यमातून त्यांनी केलेल्या कार्याचा उल्लेख उपस्थितांनी केला. जनतेच्या प्रश्नांसाठी सदैव उपलब्ध राहणारे लोकप्रतिनिधी म्हणून त्यांची ओळख असल्याचेही वक्त्यांनी नमूद केले.

वाढदिवसानिमित्त आयोजित या कार्यक्रमाने केवळ उत्सवाचे स्वरूप न राखता सामाजिक सेवेचा संदेश दिला. दिव्यांगांना ट्रायसायकलचे वितरण, रक्तदान शिबिर आणि विविध सेवा उपक्रमांमुळे हा वाढदिवस जनतेसाठी उपयुक्त ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

संपूर्ण दिवस शुभेच्छुकांची रीघ लागलेली असताना गोंदिया जिल्ह्यातील विविध भागांतून आलेल्या नागरिकांनी आमदार विनोद अग्रवाल यांना भेटून शुभेच्छांचा वर्षाव केला.

जलाराम लॉन परिसरात उत्साहाचे वातावरण असून, वाढदिवसानिमित्त आयोजित कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

आमदार विनोद अग्रवाल यांनी उपस्थित नागरिक, कार्यकर्ते व शुभेच्छुकांचे आभार मानत भविष्यातही जनसेवा आणि विकासकार्याला प्राधान्य देण्याचा निर्धार व्यक्त केला.

# गुटखा विक्री प्रकरणातील आरोपीला नोटीस देऊन सोडले, मनप्रभावी' संस्थेचे पोलीस आयुक्तांना थेट पत्र, कोर्टात पिटीशन दाखल करण्याचा इशारा

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** गुटखा विक्री विरोधात केलेल्या कारवाईत आरोपीला बिएनएस कलम १२३ न लावता आरोपीला केवळ नोटीस देऊन सोडल्याचा खळबळजनक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी 'मनप्रभावी व्यसनमुक्ती सामाजिक संस्था' चे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. संतोष दत्ताराम खांडेकर यांनी नवी मुंबईचे पोलीस आयुक्त यांना थेट पत्र लिहून संबंधित पोलीस अधिकाऱ्यांवर तात्काळ चौकशी व कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे. कारवाई न झाल्यास थेट न्यायालयाचे दरवाजे ठोठावण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.



या संदर्भात पोलीस आयुक्तांना दिलेल्या अर्जात नमूद करण्यात आले आहे की, २० मार्च २०२६ रोजी पनवेल तालुका पोलीस स्टेशनच्या हद्दीत कसलखंड येथे गुटखा विक्री करणाऱ्या एका इसमाला गुटख्यासह संस्थेचे पदाधिकारी हरेश पाटील यांनी पकडून दिले होते. मात्र पोलिसांनी गुन्हा गांभीर्याने न घेता तात्काळ नोटीसवर त्याला सोडून दिले. त्यानंतर ९ एप्रिल रोजी ११२ या आपत्कालीन क्रमांकावर तक्रार करून पनवेल रसायनी रोडवरील नवकार कंपनी गेटसमोरील एका टपरीवर बेकायदेशीर गुटखा विक्री होत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आणून दिले गेले. तब्बल १० वेळा कॉल केल्यानंतर दोन तासांनी पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी तेथे पंचनामा करून गुटखा व दारू जप्त केली. या केसमध्ये ॲड. संतोष खांडेकर आणि हरेश पाटील स्वतः जप्ती पंचनाम्याचे साक्षीदार आहेत.

परंतु, या कारवाईनंतर संबंधित तपास अधिकारी यांनी या आरोपीला केवळ नोटीस देऊन सोडून दिले. ॲड. खांडेकर यांनी याबाबत विचारणा केली, तेव्हा हा गुन्हा ७ वर्षे शिक्षेचा असल्याने आम्ही त्याला सोडले असे उत्तर पोलिसांनी दिले. मात्र, ॲड. खांडेकर यांनी न्यायालयात प्रॅक्टिस करत असल्याचा हवाला देत स्पष्ट केले की, भारतीय न्याय संहिता कलम १२३ नुसार हा गुन्हा १० वर्षे शिक्षेचा असून यामध्ये आरोपीला थेट सोडता येत नाही. असे असूनही पोलिसांनी त्यांचे ऐकून घेतले नाही. यामुळे पोलिसांचा हेतू प्रथमदर्शनी आरोपीला मदत करण्याचा आणि आपल्या पदाचा गैरवापर करण्याचा असल्याचा आरोप अर्जात करण्यात आला आहे.

संबंधित आरोपी अजूनही त्याच टपरीवर बेधडकपणे गुटखा आणि दारू विकत आहे. तसेच या भागात 'भोला' आणि 'गोविंद' नावाचे व्यक्ती या टपऱ्यांवर गुटखा पुरवत असल्याची माहितीही समोर आली असून संस्था त्याचे पुरावे गोळा करत आहे.या गंभीर प्रकरणाबाबत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री (गृहमंत्री) यांना प्रत्यक्ष अथवा पत्राद्वारे कळविण्यात येणार असून, पोलीस खात्याच्या विरोधात न्यायालयात पिटीशन (याचिका) दाखल करणार असल्याचे ॲड. संतोष खांडेकर यांनी पत्राच्या शेवटी नमूद केले आहे. यावर नवी मुंबई पोलीस आयुक्त काय पावले उचलतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# मृत अर्भक टॉयलेट मधील फिनेलच्या बादलीत लपवले

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** मृत अर्भक क्लीनिकच्या टॉयलेटमध्ये फिनेलचे पाणी असलेल्या बादलीत लपवून ठेवल्याची घटना दोन जून रोजी पुरारकर क्लिनिक अँड डायग्नोस्टिकमध्ये घडली. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात आरोपी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. एक तरुणी मंगळवारी दोन जून रोजी सायंकाळी लाईन आळी पनवेल येथील पुरारकर क्लिनिक अँड डायग्नोस्टिक मध्ये तपासनीसाठी गेली होती. यावेळी तिने क्लिनकच्या टॉयलेटमध्ये अंदाजे पाच ते सहा महिन्यांच्या मृत अर्भकाला जन्म दिला. याची माहिती कोणाला कळू नये यासाठी तिने मृत अर्भक टॉयलेटमधील फिनेल मिश्रित पाण्याच्या बादलीत लपवून ठेवले. हा प्रकार डॉक्टरांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी या प्रकाराची माहिती पनवेल शहर पोलिसांना दिली. पनवेल शहर पोलिसांनी तरुणी विरोधात गुन्हा दाखल केला. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

# राष्ट्रीय ग्रापलिंग स्पर्धेत महाराष्ट्राचा डंका! ५ सुवर्णपदकांसह पटकावले चौथे स्थान

**दैनिक युवक आधार**

**निफाड क्रीडा प्रतिनिधी विलास गायकवाड :** नाशिक /_ गुवाहाटी (आसाम) येथे पार पडलेल्या १९ व्या राष्ट्रीय ग्रापलिंग चॅम्पियनशिप २०२६ मध्ये महाराष्ट्राच्या खेळाडूंनी ऐतिहासिक कामगिरी केली आहे. या स्पर्धेत महाराष्ट्राने एकूण २४ पदके (५ सुवर्ण, ८ रौप्य आणि ११ कांस्य) जिंकून राष्ट्रीय स्तरावर आपली छाप पाडली. या शानदार कामगिरीच्या जोरावर महाराष्ट्र संघाने देशभरात चौथे स्थान पटकावले आहे 24 राज्यांमधील 567 खेळाडूंमध्ये चुरस

राष्ट्रीय स्पर्धा २९ ते ३१ मे २०२६ दरम्यान गुवाहाटी येथे संपन्न झाली. यात देशातील २४ राज्यांतील ५६७ खेळाडूंनी सहभाग घेतला होता. कॅडेट, युथ, सीनियर आणि वेटरन्स




अशा महिला व पुरुष गटांमध्ये 'ग्रापलिंग गी', 'नो-गी' आणि 'मल्लयुद्ध' प्रकारात अत्यंत चुरशीचे सामने खेळवले गेले.

ग्रापलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रतर्फे या स्पर्धेसाठी १७ खेळाडूंचा मजबूत महाराष्ट्र संघ उतरवण्यात आला होता. मार्गदर्शन म्हणून संघाला असोसिएशनच्या अध्यक्षा अर्चना देशमुख व सचिव संतोष देशमुख यांचे खंबीर नेतृत्व व मार्गदर्शन लाभले.

प्रशिक्षक व संघव्यवस्थापक: दुष्यंतराजे देशमुख यांनी प्रशिक्षक आणि व्यवस्थापक म्हणून आपली जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली.महाराष्ट्राच्या संदीप बोरसे, अनिकेत भवर, प्रशांत आढाव आणि ईश्म देशमुख यांनी स्पर्धेत राष्ट्रीय पंच म्हणून उत्कृष्ट कामगिरी बजावली. राष्ट्रीय स्पर्धेमध्ये महाराष्ट्रा खेळाडू नी उत्कृष्ट खेळकरच संघाला सुवर्णपदक मिळवून दिले त्यामध्ये

सुवर्णपदक विजेते (Gold Medal),मृणालिनी अरुण खेडकर (२ सुवर्णपदके),संस्कृती दत्तात्रय घुगे (२ सुवर्णपदके),उमेश सुभाष पाटील (१ सुवर्णपदक)

रौप्यपदक विजेते (Silver Medal),उमेश सुभाष पाटील,प्रियदर्शनी अभय पाटील,कुंजिका दत्तात्रय गुरुबा,रोनक विष्णुकांत टेलर,संकेत किरण परदेशीसार्थक दीपक गायकवाड,हुंविष्क दिनकर सुरवाडे साई संजय देशमुख,कांस्यपदक विजेते (Bronze Medal),ईश्म संतोष देशमुख(२कांस्यपदके),शिवराज दुष्यंतराजे देशमुख,जयेश दत्तात्रय पाटील,संकेत संभाजी पाटील,प्रणय संजय बावस्कर,संकेत किरण परदेशी,रोशन साईराम नरोटेसार्थक दीपक गायकवाड,रोनक टेलर,हुंविष्क दिनकर सुरवाडे तसेच विशेष सहभाग: या स्पर्धेत महाराष्ट्राचे खेळाडू वैभव गणेश वाघ यांनीही राज्याचे प्रतिनिधित्व करत उत्कृष्ट खेळ केला. महाराष्ट्र संघाच्या या घवघवीत यशाबद्दल सर्व पदक विजेते खेळाडू, प्रशिक्षक, पंच व संघ व्यवस्थापनाचे 'ग्रापलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र'सह राज्यभरातील क्रीडाप्रेमी, पदाधिकारी आणि जिल्हा प्रतिनिधींनी अभिनंदन केले आहे. महाराष्ट्राच्या खेळाडूंनी केलेली ही कामगिरी राज्यातील ग्रापलिंग खेळाचा वाढता आलेख दर्शवणारी असून, आगामी आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी खेळाडूंचा आत्मविश्वास वाढवणारी ठरेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# महिला भाविकाची पर्स केली परत

**दैनिक युवक आधार**

**श्रीक्षेत्र माहूर प्रतिनिधी/सय्यद इसा :** नागपूर येथील महिला भाविक माहूर गडावर रेणुका मातेचे दर्शन घेण्यासाठी आले असता त्यांची मंगळसूत्र कागदपत्रे व इतर साहित्य असलेली पर्स संत गुलाब बाबा हॉटेल येथे विसरली होती दर्शन आटोपून माहूर शहरातील लॉजवर गेल्यानंतर त्यांच्या लक्षात आल्याने त्या घाबरल्या परत गडावर येऊन चौकशी केली असता हॉटेलचे संचालक संजय घोगरे यांनी त्यांना ओळखून हॉटेलमध्ये बोलावत त्यांची पर्स त्यांना परत केल्याने महिला भाविकासह गडावरील सर्व प्रतिष्ठान चालक विश्वस्त मंडळाकडून त्यांचे अभिनंदन होत आहे

धोंड्याचा महिना असल्याने माहूर गडावरील सर्व मंदिर मठात भाविकांची मोठ्या प्रमाणात दर्शनासाठी गर्दी होत आहे येत्या पंधरा तारखेपर्यंत गडावर भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होणार असल्याने भाविकांचे सुरक्षेसाठी पोलिसांकडून विशेष सुरक्षा पथकाच्या नेमणुकीची मागणी होत असून दि 4 रोजी नागपूरवरून श्रीमती माधुरी पळसेकर ह्या आपल्या मुलीसह रेणुका माता मंदिरात दर्शनासाठी आल्या होत्या दर्शन झाल्यानंतर चहा घेण्यासाठी त्या संत गुलाब बाबा हॉटेलमध्ये थांबल्या असता जाताना त्यांची पर्स टेबलावरच विसरली त्यामुळे हॉटेलचे कर्मचारी व संचालक संजय घोगरे यांनी ती पर्स ताब्यात घेऊन

### श्रीक्षेत्र माहूर गडावरील संत गुलाब बाबा हॉटेल चे संचालक पत्रकार संजय घोगरे यांचा प्रमाणिकपणा



मंदिर व्यवस्थापनास ही बाब कळविली होती

श्रीमती माधुरी कळसेकर यांनी शहरात जाऊन लॉज वर रूमची चावी पाहण्यासाठी पर्स ची आठवण आली असता त्या घाबरून पुन्हा परत मंदिरावर आल्या


येथे संजय घोगरे नगरसेवक प्रतिनिधी राजू सौंदलकर यांचे सह व्यवसायिकांनी त्यांना हॉटेलमध्ये नेऊन ती पर्स व आतील सर्व साहित्याची खातरजमा करून त्यांना परत केली त्यामुळे त्यांनी संजय घोगरे कर्मचारी आणि माहूरकरांचे आभार व्यक्त केले संजय घोगरे हे शहरातील प्रतिष्ठित पत्रकार असल्याने त्यांनी केलेल्या कार्याचे मंदिर व्यवस्थापन समिती व्यवसायिक भाविक नागरिकातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# नवेल वाहतूक पोलिसांच्या तत्परतेमुळे अपघातग्रस्तांना मिळाले वेळेत उपचार

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** 3 जून रोजी सायंकाळी ७.३० वाजण्याच्या सुमारास शिवशंभो सिग्नल, पनवेल येथे कर्तव्य बजावत असताना पोलीस हवालदार अमीर मुलाणी व पोलीस शिपाई सुरेश जोंजाळ यांना वाहनचालक नागरिकामार्फत गाढी नदी पुलावर मोटरसायकलचा अपघात झाल्याची माहिती मिळाली. अपघातात दोन व्यक्ती जखमी होऊन रस्त्यावर पडल्याचे समजताच दोन्ही पोलीस अंमलदारांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. घटनास्थळी पोहोचल्यावर जखमी व्यक्ती रस्त्यावर पडलेल्या अवस्थेत आढळून आले. त्यांनी नागरिकांच्या मदतीने जखमींना सुरक्षितपणे उचलून





ॲम्बुलन्सची प्रतीक्षा न करता तेथून जाणाऱ्या ऑटो रिक्षामध्ये बसविले. व स्वतः जखमींसोबत उपजिल्हा रुग्णालय, पनवेल येथे गेले व त्यांना तातडीने उपचारासाठी दाखल केले. त्यानंतर पुढील कारवाईसाठी पनवेल शहर पोलीस स्टेशन यांना माहिती देण्यात आली.दरम्यान या घटनेची माहिती पनवेल शहर वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर भा. पाटील यांना तात्काळ देण्यात आली. त्यांनी घटनास्थळी अतिरिक्त अंमलदार पाठवून वाहतूक सुरळीत ठेवण्याच्या सूचना दिल्या तसेच जखमींना आवश्यक ती मदत व उपचार मिळतील याबाबत दक्षता घेण्याचे निर्देश दिले. वाहतूक पोलिसांच्या प्रसंगावधान, तत्परता आणि मानवतावादी भूमिकेमुळे जखमींना वेळेत वैद्यकीय उपचार मिळाले. या कार्याबद्दल नागरिकांकडून वाहतूक पोलिसांचे कौतुक करण्यात येत आहे.

# पक्षाच्या जडणघडणीत आणि पक्षाचा देशभरात विस्तार होण्यासाठी आदरणीय अजितदादांचे मोठे योगदान

## दादांना समर्पित असा हा वर्धापन दिन साजरा करण्याचे नियोजन - सुनिल तटकरे

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी -** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा २७ वा वर्धापन दिन बुधवार दिनांक १० जून रोजी साजरा करण्यात येणार असून या वर्धापन दिनाच्या नियोजनासाठी आज मुंबई विभागीय राष्ट्रवादी काँग्रेसची बैठक प्रदेश कार्यालयात पार पडल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी दिली.

पक्षाचा वर्धापन दिन राष्ट्रीय अध्यक्षा आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या अनुमतीने आणि पक्षाच्या सर्व वरिष्ठ नेत्यांच्या सहमतीने मुंबई षण्मुखानंद सभागृहात घेण्याचा निर्णय झाल्याचे सुनिल तटकरे यांनी सांगितले.

१० जून रोजी दुपारी २ वाजता राज्यातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते षण्मुखानंद सभागृहात जमा होतील त्यानंतर ३ वाजता कार्यक्रमाला सुरुवात होईल.

पक्षाच्या जडणघडणीत आणि पक्षाचा देशभरात विस्तार होण्यासाठी आदरणीय अजितदादांचे मोठे योगदान लाभलेले आहे.

त्यामुळे दादांना समर्पित असा हा वर्धापन दिन साजरा करण्याचे नियोजन पक्षाचे सर्व पदाधिकारी करत आहेत. याच आयोजनासाठी ही बैठक घेण्यात आली असे सुनिल तटकरे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

या बैठकीला माजी मंत्री नवाब मलिक, आमदार सना मलिक-शेख, ठाणे जिल्हाध्यक्ष नजीब मुल्ला, प्रदेश उपाध्यक्ष प्रमोद हिंदूराव, मुंबई कार्याध्यक्ष सिध्दार्थ कांबळे, प्रदेश सरचिटणीस संतोष धुवाळी, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते उमेश पाटील, कार्यालयीन सचिव संजय तटकरे, प्रदेश सरचिटणीस लतिफ तांबोळी, प्रदेश उपाध्यक्ष बाप्पा सावंत, सहकोषाध्यक्ष संजय बोरगे, मुंबई महिला अध्यक्षा आरती साळवी आणि सर्व जिल्हाध्यक्ष, ठाण्यातील पदाधिकारी उपस्थित होते.

# नागपूर महानगरपालिका नागपूर अतिक्रमण हटाव मोहीम

**दैनिक युवक आधार**

**नागपूर सतीश कडू संपादक विभाग** : म.न.पा प्रवर्तन विभाग मार्फत आज दिनांक 03.06.2026 रोजी एलआयसी परिसर अंतर्गत पथक क्र ०३ अतिक्रमण निर्मूलन कारवाई करण्यात आली. कारवाई मध्ये एलआयसी परिसर ते रेल्वे स्टेशन परिसर ते मानकापूर येथे अतिक्रमण निर्मूलन कारवाई करण्यात आली कारवाई मध्ये रस्त्याच्या दोन्ही बाजूस रोड व फुटपाथ वर लागून असलेले अवैध ठेलेले व दुकान हटविण्यात आले . असे अंदाजे 02 ट्रक साहित्य सामान जप्त करण्यात आले आहे ज्यामध्ये 10 ठेले व इतर साहित्य आहे व कारवाई सुरू आहे

• सीताबर्डी परिसर येथील अंतर्गत पथक क्र ०१ आणि ०४ संयुक्तरीत्या दोन्ही पथक अतिक्रमण निर्मूलन कारवाई सुरू आहे कारवाई मध्ये सिताबर्डी मेन रोड ते व्हेरायटी चौक ते परत संपूर्ण दिवस सीताबर्डी मेन रोड पर्यंत अतिक्रमण निर्मूलन कारवाई सुरू आहे.कारवाई मध्ये रस्त्यांच्या दोन्ही बाजूस रोड व फुटपात वर असलेले अवैध ठेले व दुकान हटविण्यात येत आहे.



• महाल परिसर येथील अंतर्गत पथक क्र ०२ आणि ०५ दोन्ही संयुक्तरित्या पथक अतिक्रमण निर्मूलन कारवाई सुरू आहे कारवाई मध्ये दोषार वैश्य परिसर ते महाल चौक ते बडकस चौक ते केडीबाग रोड ते गडकरी वाडा परिसर ते कल्याणेश्वर मंदिर परिसर ते परत संपूर्ण दिवस महाल आणि बडकस चौक पर्यंत अतिक्रमण निर्मूलन कारवाई सुरू आहे.कारवाई मध्ये रस्त्यांच्या दोन्ही बाजूस रोड व फुटपात वर असलेले अवैध ठेले व दुकान हटविण्यात येत आहे.

• ही कारवाई . श्री मंगेश खवले उपायुक्त प्रवर्तन विभाग, संजय कांबळे सहा. आयुक्त प्रवर्तन विभाग यांच्या मार्गदर्शनात अतिक्रमण पथक द्वारे करण्यात आली.

# शेतकऱ्यांना तातडीने पीकविमा द्या: राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार)ची मागणी

**दैनिक युवक आधार**

**दर्यापूर ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी** : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) शहर व ग्रामीण दर्यापूर तालुक्याच्या वतीने शेतकऱ्यांचा प्रलंबित पीकविमा तातडीने वितरित करण्यात यावा, अशी मागणी तहसीलदारांना निवेदनाद्वारे करण्यात आली. निवेदनात म्हटले आहे की, २०२२-२३ व २०२३-२४ या खरीप हंगामात तालुक्यातील शेतकऱ्यांना केवळ मूग पिकाचा विमा मिळाला. मात्र, तालुक्यात कापूस, तूर व हरभरा या पिकांची लागवड मोठ्या प्रमाणात होत असून या पिकांचा विमा न मिळणे ही शेतकऱ्यांची फसवणूक असल्याचा आरोप करण्यात आला. तसेच २०२४-२५ व २०२५-२६ या खरीप हंगामातील कापूस, तूर व हरभरा पिकांचा विमाही अद्याप शेतकऱ्यांना मिळालेला नाही.या काळात झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेक शेतजमिनींमध्ये मुळकूज रोगाचा प्रादुर्भाव झाला तसेच मोठ्या प्रमाणात पिकांचे नुकसान झाले. त्यामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना विमा मिळणे आवश्यक असल्याचे



निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

याशिवाय कृषी विभागाकडून यांत्रिकीकरण अवजारे व सूक्ष्म सिंचन योजनांतील अनुदानाची रक्कमही अद्याप लाभार्थी शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आलेली नसल्याचा आरोप करण्यात आला. या सर्व प्रकरणांची तातडीने चौकशी करून शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अन्यथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार)च्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला.प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार दर्यापूर शहर व ग्रामीणच्या वतीने डॉ. अभय गावंडे, गुड्डू पटेल सर, राजाभाऊ तराळ, विजयराव हावरे, जयराम वाकोडे, अरविंदराव घाटे, नमित हूत्तेक, सुशांत गावंडे, देवा भाऊ गावंडे, राम धंदर, सौरभ जळमकर, अनिल इंगळे, शंतनू बोरेकर, अक्षय गावंडे, पप्पू पाटील गावंडे, महेंद्र कंकाळे, सचिन पवार, प्रशांत गावंडे, प्रकाश देशमुख, बुद्धभूषण डोंगरे, इमरान भाई, गोपाल नांदुरकर, राजाभाऊ तायडे, देवेश काळे, सागर काळे यांच्यासह शहर व ग्रामीण भागातील पदाधिकारी, कार्यकर्ते व शेतकरी बहुसंख्येने हजर होते.

**मुख्य मागणी : 2022-23 ते 2025-26 या 4 वर्षांचा कापूस, तूर, हरभरा पिकांचा प्रलंबित विमा तात्काळ द्या.**

**कारण : अतिवृष्टी व मुळकूज रोगामुळे मोठे नुकसान.**

**इतर मुद्दा: यांत्रिकीकरण व सूक्ष्म सिंचन योजनांचे अनुदान थकीत.**

**पुढील पाऊल : न्याय न मिळाल्यास तीव्र आंदोलन.**

# अखिल भारतीय चित्रपट महामंडळ निवडणूकीत समर्थ पॅनलला कलाकारांचा वाढता पाठिंबा

**दैनिक युवक आधार**

**सणसर विकास क्षत्रिय** : अखिल भारतीय चित्रपट महामंडळाच्या २०२६ च्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असून विविध पॅनल आणि उमेदवारांकडून प्रचाराला वेग आला आहे. याच पार्श्वभूमीवर समर्थ पॅनलचे प्रमुख नेते मा. मेघराज राजे भोसले यांनी महाराष्ट्रातील तमाम कलाकारांना समर्थ पॅनलच्या सर्व अधिकृत उमेदवारांना मतदान करण्याचे आवाहन केले आहे."माझा पॅनल, माझा विश्वास" या घोषवाक्याखाली समर्थ पॅनलचा प्रचार सुरू असून



चित्रपटसृष्टीतील कलाकार, तंत्रज्ञ आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून या पॅनलला पाठिंबा मिळत असल्याचे सांगण्यात आले.समर्थ पॅनलच्या सर्व उमेदवारांना निशाणी पतंग समोरील बटण दाबून प्रचंड बहुमताने विजयी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या निवडणुकीत गीतकार प्रदीप कांबळे, आनंद शिंदे (महाराष्ट्राचा बुलंद आवाज) यांच्यासह अनेक दिग्गज कलाकारांनी समर्थ पॅनलला जाहीर पाठिंबा दिल्याची माहिती देण्यात आली. चित्रपट क्षेत्रातील कलाकारांचा सन्मान,चित्रपटसृष्टीचा सर्वांगीण विकास,एकता, विश्वास आणि प्रगती या मुद्द्यांवर समर्थ पॅनल आपला प्रचार करत आहे. यावेळी बोलताना मेघराज राजे भोसले यांनी सांगितले की, चित्रपटसृष्टीतील कलाकार,तंत्रज्ञ आणि सदस्यांच्या हितासाठी काम करणारे सक्षम नेतृत्व निर्माण करण्यासाठी समर्थ पॅनल कटिबद्ध आहे. महामंडळाच्या विकासासाठी तसेच कलाकारांच्या विविध प्रश्नांना न्याय देण्यासाठी सर्व सदस्यांनी एकजुटीने मतदान करून समर्थ पॅनलच्या सर्व उमेदवारांना भरघोस मतांनी निवडून द्यावे.

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर समर्थ पॅनलला मिळणारा वाढता प्रतिसाद आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांचा पाठिंबा यामुळे निवडणुकीत चुरस निर्माण झाली असून चित्रपटसृष्टीचे लक्ष या निवडणुकीकडे लागले आहे.

# श्री छत्रपती व्यायामशाळेस चेअरमन पृथ्वीराज बापू जाचक यांची भेट पैलवानांसाठी विविध सुविधांची घोषणा

**दैनिक युवक आधार**

**सणसर :- विकास क्षत्रिय** : भवानीनगर येथील श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन पृथ्वीराज बापू जाचक,व्हा. चेअरमन कैलास तात्या गावडे तसेच संचालक गणपतराव कदम,मंथन कांबळे अशोक पाटील आदी संचालक मंडळाने कारखान्याच्या श्री छत्रपती व्यायामशाळेस भेट देऊन तेथील कामकाजाची पाहणी केली.यावेळी चेअरमन पृथ्वीराज बापू जाचक यांनी तालमीत सराव करणाऱ्या सर्व पैलवानांची



आस्थेने चौकशी करून शुभेच्छा देण्यात आल्या. तसेच व्यायामशाळेतील आवश्यक सुविधांचा आढावा घेत पैलवानांसाठी पिण्याच्या पाण्याचा फिल्टर,लाल मातीचा आखाडा,खुराक, कंपाउंड,पंखे व रंगकाम यांसारख्या भौतिक सुविधा त्वरित उपलब्ध करून देण्याचे निर्देश अधिकारी यांना दिले. भेटीदरम्यान लहान व युवा पैलवानांचीही आस्थेने विचारपूस करण्यात आली. यावेळी वस्ताद पै.राजेंद्र गावडे यांनी चेअरमन पृथ्वीराज बापू जाचक,व्हा.चेअरमन कैलास तात्या गावडे,संचालक गणपतराव कदम अशोक पाटील व मंथन कांबळे यांचा सत्कार करून स्वागत केले.या प्रसंगी ज्येष्ठ वस्ताद काका टकले,समालोचक पै.प्रशांत भागवत माऊली नलवडे,पै.थोरात,पै.शेंडगे,पै. शिंदे तसेच अनेक पालक व कुस्तीप्रेमी उपस्थित होते. व्यायामशाळेतील पैलवानांना उत्तम सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कारखाना प्रशासन कटिबद्ध असल्याचे मत यावेळी पृथ्वीराज बापू जाचक व मान्यवरांनी व्यक्त केले.

# डॉ . बाबासाहेब आंबेडकर नगर फायर स्टेशन परिसर प्रकाशमय ; नवीन स्ट्रीट लाईटमुळे नागरिकांमध्ये आनंद

**दैनिक युवक आधार**

**नांदेड प्रतिनिधी: विश्वदीप कांबळे :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर फायर स्टेशन परिसरात नवीन स्ट्रीट लाईट बसविण्यात आल्याने परिसरातील नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. नगरसेविका राजश्री कुलदीप राक्षसमारे यांच्या विशेष प्रयत्नातून तसेच आंबेडकरी चळवळीचे युवा नेते विक्की वाघमारे यांच्या उपस्थितीत हा उपक्रम पूर्णत्वास आला.परिसरात अनेक दिवसांपासून पुरेशा प्रकाशव्यवस्थेची गरज नागरिकांकडून व्यक्त केली जात होती. अखेर या मागणीची दखल घेत नवीन स्ट्रीट लाईटची व्यवस्था करण्यात आल्याने रात्रीच्या वेळी नागरिकांना सुरक्षितपणे ये-जा करणे सुलभ झाले आहे.या स्ट्रीट लाईटमुळे परिसरातील



रस्ते उजळून निघाले असून महिला, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या सुरक्षिततेत मोठी भर पडणार आहे. तसेच परिसराच्या सौंदर्यातही वाढ झाली असून नागरिकांनी या कामाचे स्वागत केले आहे.नागरिकांच्या मूलभूत सुविधांमध्ये झालेली ही महत्त्वपूर्ण भर विकासाच्या दृष्टीने सकारात्मक पाऊल मानली जात आहे. या कामासाठी पुढाकार घेणाऱ्या नगरसेविका राजश्री कुलदीप राक्षसमारे, यांचे व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांचे नागरिकांनी आभार व्यक्त करत कौतुक केले आहे.

# हिरालालनगरातील पाण्याच्या टाकीखाली आढळला बेपत्ता व्यक्तीचा मृतदेह, परतूर परिसरात खळबळ

**दैनिक युवक आधार**

**परतूर-जालना(अशोक ठोके) :** दि.4 जून 2026 रोजी परतूर शहरातील हिरालालनगर भागात आज एका बेपत्ता व्यक्तीचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

मृत व्यक्तीचे नाव सुरेश ढाकरगे असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यांची पत्नी उषा सुरेश ढाकरगे यांनी पती बेपत्ता असल्याची तक्रार 2 जून 2026 रोजी परतूर पोलिस स्टेशनमध्ये दाखल केली होती तेंव्हापासून सुरेश ढाकरगे यांचा शोध त्यांचे नातेवाईक, मित्रमंडळी व पोलिस घेत होते मात्र आज सकाळी त्यांची मोटारसायकल हिरालाल नगरातील नगरपरिषदेच्या पाण्याच्या टाकीजवळ बाभळीच्या झुडपात आढळून आली,त्यावरून शोध घेतला असता नगर पालिकेच्या पाण्याचा टाकी खाली त्याचा मृतदेह आढळून आला .घटनेची माहिती मिळताच परतूर पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली व पंचनामा केला. मृतदेहाची ओळख पटल्यानंतर तो सुरेश ढाकरगे यांचाच असल्याचे स्पष्ट झाले.



परतूर पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी परतूर येथील ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आला. शवविच्छेदन अहवालानंतरच मृत्यूचे नेमके कारण समजू शकेल, असे पोलिसांनी सांगितले.या प्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून, पुढील तपास सुरू आहे. सुरेश ढाकरगे बेपत्ता कसे झाले आणि त्यांचा मृत्यू कशामुळे झाला, याचा तपास पोलिस करीत आहेत.दरम्यान, या घटनेमुळे हिरालालनगर व परतूर परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, या घटनेबाबत कोणाला काही माहिती असल्यास त्यांनी तात्काळ परतूर पोलिसांशी संपर्क साधावा.

# 'रायवळ' आंबा संवर्धनासाठी सिल्लोडचा पुढाकार

## पर्यावरण दिन विशेष: गावरान जातींच्या जतनासाठी डॉ. संतोष पाटील यांची मोहीम

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : 'आम' म्हणजे सर्वसाधारण जनतेस सहज उपलब्ध होणारा फळांचा राजा आंबा. महाराष्ट्र राज्याचा राज्यवृक्ष, हरित मानचिन्ह आणि भारताचे राष्ट्रीय फळ असलेल्या या आंब्याचे संवर्धन करण्यासाठी जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून सिल्लोडमध्ये विशेष प्रयत्न सुरू आहेत. कलमी युगात दुर्लक्षित आणि संकटात सापडलेल्या आपल्या अस्सल 'रायवळ' (गावरान) आंब्याच्या जातींचे जतन करण्याचा विडा पर्यावरण अभ्यासक डॉ. संतोष पाटील (राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, पर्यावरण गतिविधी दायित्व) यांनी उचलला आहे.

**स्थानिक वाणांचे संवर्धन**

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात रायवळ आंब्याच्या अनेक वैशिष्ट्यपूर्ण जाती आहेत. रंग, आकार आणि चवीनुसार त्यांना खोबऱ्या, गोटी,



**[ आंब्याचा सांस्कृतिक वारसा]**

**भारतीय संस्कृतीत आंबा 'नक्षत्र वृक्ष' मानला जातो. अजिंठा लेणीतील चित्रशैलीत आंब्याचा वृक्ष अत्यंत बारकाईने चित्रित केला आहे. सांची स्तूपावरील कोरीव काम आणि तमिळ भाषेतील 'मंगा' शब्दावरूनच जागतिक स्तरावर प्रचलित झालेला फळांचा राजा, त्याचा प्राचीन इतिहास अधोरेखित करतो.**

चिकाड्या, साखऱ्या, शेप्या, चोख्या, नकट्या, चिपड्या, शेंद्रा, तांब्या, तुप्या, तेलंगी, कागदी, पुंगटी, खाऱ्या, पादऱ्या, ढवळा, लोण्या, हडका अशी नावे आहेत. या स्थानिक वाणांचे संवर्धन करण्यासाठी डॉ. पाटील विविध ठिकाणांहून बिया (कोयी) संकलित करून रोपे तयार करत आहेत. यामध्ये विदर्भातील अकोला भागातील प्रसिद्ध 'साखऱ्या' आंबा जातीचाही समावेश आहे. ही रोपे येत्या जुलै महिन्यात विविध ठिकाणी लावली जाणार आहेत. गतवर्षीही या मोहिमेद्वारे मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करण्यात आले होते.

**[ जैवविविधतेचा धनी]**

**"आंब्याचा फुलोरा मधमाशा, इंडियन जेझेबल, ग्रे पन्सी आणि मुंग्यांना अन्न पुरवतो. कॉपर फ्लॅश, बॅरोनेट आणि कॉमन बॅरन फुलपाखरे यावर आपला जीवनक्रम आरंभतात. बांडगुळाच्या पानांवर ब्रॉडटेल, पिकॉक रॉयल, कॉमन जेझेबल, व्हाईट रॉयल अंडी घालतात. अनेक पक्षी, वटवाघूळ आणि प्राणी या फळांचा आहार घेतात. ही जैवविविधता टिकवण्यासाठीच आम्ही रायवळ आंब्याचे संवर्धन करत आहोत."**

**— डॉ. संतोष पाटील, पर्यावरण अभ्यासक, सिल्लोड**

# ग्राम सचिवालयाची प्लॅस्टिक वापरावर बंदी

**दैनिक युवक आधार**

**बागलाण तालुका प्रतिनिधी- दीपक गायकवाड** : ता.०३,मौजे मुल्हेर ता. बागलाण जि. नाशिक येथील सर्व व्यावसायिकांना ग्रामपंचायतने नोटीस देउन कळविण्यात आले की, आपण करीत असणा-या व्यवसायामध्ये दैनंदिन वापरत असणा-या प्लॅस्टिक पिशव्यावर बंदी घातली असून कागदी अथवा कापडी पिशव्याचा नागरिकांनी बाजारात वापर करण्याचे आव्हान करण्यात आले जेणेकरून परिसर प्लास्टिक मुक्त होईल.महाराष्ट्र शासनाच्या वतीने प्लॅस्टिक पिशवी आणि थर्माकोल मुक्त महाराष्ट्र या कार्यक्रमाव्दारे २०१८ पासून संपुर्ण राज्यात प्लॅस्टिक वापरावर बंदी घालण्यात आलेली असून यामध्ये प्रामुख्याने खालील



बाबीचा समावेश होतो. सर्व प्रकारच्या ५० मायक्रॉन पेक्षा कमी जाडी असलेल्या प्लॅस्टिक पिशवी,थर्माकोल व प्लॅस्टिकपासून बनविण्यात येणा-या व एकदाच वापरल्या जाणा-या डिस्पोजेबल वस्तू ताट, कप्स, प्लेटस, ग्लास, वाटी, चमचे हॉटेलमध्ये अन्न पदार्थ पार्सल प्लॅस्टिक पिशवी,पाऊच इत्यादी.

वरील बंदी असलेले प्लॅस्टिक पिशव्या अथवा उत्पादन वापरणा-यास ५,०००/- रु. दंड दुस-यांदा १०,०००/- रु. दंड आणि तिस-यांदा गुन्हा केला तर २५,०००/- रु. दंड आणि तीन महिन्यापर्यंत शिक्षेची तरतुद असल्याचे ग्रामविकास अधिकारी गणेश जाधव यांनी सांगितले तर गावातील सर्व व्यावसायिकांनी प्लॅस्टिक पिशव्या ऐवजी कापडी व कागदी पिशव्यांचा वापर करावा आणि प्लॅस्टीकचा वापर टाळावा व गाव प्लॅस्टिकमुक्त करण्यास हातभार लावावा असे आवाहन सरपंच निंबा भानसे, उपसरपंच सागर भानसे व सदस्य, माजी उपसरपंच चंद्रकांत खरे, सदस्य आशाबाई जगताप यांनी केले.

# स्त्री शक्तीच्या उद्योजकतेला मिळणार चालना!!

## 'अमृत'ची उद्योजकता विकास 'महिला स्पेशल' बॅच सुरू!!

**दैनिक युवक आधार**
**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : 'अमृत' मार्फत लघुउद्योजक निर्मिती तसेच उद्योजकता विकास व्हावा यासाठी 'अमृत उद्यम प्रशिक्षण कार्यक्रम' राबविला जातो. या कार्यक्रमाच्या माध्यमातून उद्योग करायला उत्सुक पण उद्योग कसा करावा, कोणता करावा यांबाबत अनभिज्ञ असलेल्या युवक, युवती, महिला यांच्याकरिता उद्यम प्रशिक्षण कार्यक्रम (EDP) छत्रपती संभाजीनगर विभागीय आणि जिल्हा कार्यालय येथे राबविला जात आहे.छत्रपती संभाजीनगर येथे अमृतच्या पहिल्या 'महिला स्पेशल' बॅचचा शुभारंभ श्री. दीपक जोशी (राज्य समन्वयक, अमृत) यांच्या हस्ते, तसेच अमित सामंत (विभाग व्यवस्थापक, मराठवाडा), ओंकार शेटे (विभाग उपव्यवस्थापक, मराठवाडा), अक्षय लंबे (जिल्हा व्यवस्थापक, छ. संभाजीनगर), योगेश रोडे (जिल्हा उपव्यवस्थापक, छत्रपती संभाजीनगर), अमृत सखी मंजू कुलकर्णी, अमृत सखी रुचा शर्मा, अमृत मित्र रामेश्वर साळुंके यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला.

पहिल्या दिवशी उद्योगाची निवड, व्हिजन-मिशन स्टेटमेंटची आवश्यकता, उद्योजकीय मानसिकता, नव्या युगासाठी उद्योजकांना



**अमृत EDP उपक्रमाची वैशिष्ट्ये:**
**अमृत EDP कार्यक्रमाच्या माध्यमातून उद्योगाची निवड, आवश्यक शासकीय परवानग्या, बँक कर्ज, विविध शासकीय योजना, ब्रँडिंग, मार्केटिंग, सेल्स, सोशल मीडिया मार्केटिंग, निर्यात आदींबाबत माहिती देऊन त्यांनी उद्योग सुरू करेपर्यंत पाठपुरावा केला जातो आणि त्यानंतर उद्योग सुरू राहावा यासाठी 'हॅन्ड होल्ड सपोर्ट' दिला जातो**

आवश्यक गुण आदींबाबतचे प्रशिक्षण अमित सामंत यांनी दिले. या इंटरऍक्टिव्ह सेशनमध्ये महिलांनी उत्स्फूर्तपणे भाग घेऊन अनेक शंकांचे निरसन करून घेतले. आपल्याकडे असणाऱ्या स्किलचे व्यवसायात रूपांतर कसे करावे, याबाबत भगिनी वर्गाची पूर्वतयारी होण्यात या सेशनचा खूप फायदा होईल, असे भगिनी वर्गाने आवर्जून सांगितले..

# महिलांना 50% टक्के आरक्षण तर द्याच पण 100% टक्के संरक्षणही द्या – शिवश्री प्रा. सतीश उखर्डे

**दैनिक युवक आधार**
**गेवराई तालुका प्रतिनिधी भीमराव गावडे** : दि. २ जून २०२६ वार मंगळवार रोजी रात्री लोकमाता,राष्ट्रमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त मादळमोही येथे आयोजित व्याख्यानमालेत प्रेरणादायी वक्ते तथा महाराष्ट्र सन्मान पुरस्कार प्राप्त शिवश्री प्रा.सतीश उखर्डे (टेंभुर्णीकर)यांनी महिलांच्या सक्षमीकरणाबाबत प्रभावी विचार मांडताना, "महिलांना ५० टक्के आरक्षण देत असाल तर त्याचबरोबर त्यांना शंभर टक्के संरक्षणही मिळाले पाहिजे,"* असे प्रतिपादन केले.

सायंकाळी ८ वाजता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन व अभिवादन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी भाजपा युवा नेते शिवराज पवार, भाजपा नेते बदामराव



पंडित, मादळमोहीचे सरपंच राजेंद्र वारंगे, भाजपा गेवराई तालुकाध्यक्ष पवन गावडे, युवा नेते संदीप आंधळे, मच्छिंद्र यादव, श्री कैलास माने,माजी सभापती पंढरीनाथ लगड, युवा नेते बाळासाहेब सानप, पंचायत समिती सदस्य जयसिंह जाधव, शिवसेना सर्कल प्रमुख अंकुश झिंगरे, पत्रकार शरद शेजाळ यांच्यासह राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर आणि जय मल्हार ग्रुपचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात शिवनंदा गावडे यांनी अहिल्यादेवींचे विचार आपल्या मनोगतातून उपस्थितांपर्यंत पोहोचवले. पंढरीनाथ लगड यांनी अहिल्यादेवींच्या शौर्य, कर्तृत्व आणि करारी स्वभावाचा गौरव केला. युवा नेते बाळासाहेब सानप यांनीही आपले विचार व्यक्त केले.


व्याख्याते बदामराव आबा पंडित यांनी सर्व जाती-धर्मातील नागरिकांनी एकत्र येऊन महामानवांचे विचार आत्मसात करणे गरजेचे असल्याचे सांगत, अशा जयंती उत्सवांचे महत्त्व अधोरेखित केले.मुख्य व्याख्यानात प्रा. सतीश उखर्डे यांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मापासून ते त्यांच्या अद्वितीय राज्यकारभारापर्यंतचा इतिहास प्रभावी शैलीत उलगडला. मनगटातील बळ, बुद्धिमत्ता आणि चातुर्य यांच्या जोरावर सामान्य व्यक्तीही लोकाभिमुख नेतृत्व घडवू शकते, हे अहिल्यादेवींच्या जीवनचरित्रातून स्पष्ट होत असल्याचे त्यांनी सांगितले. समाजातील महिलांनी अहिल्यादेवींना आदर्श मानून आत्मविश्वासाने पुढे यावे, असे आवाहनही त्यांनी केले.

अहिल्यादेवी होळकर या केवळ महाराष्ट्रातील नव्हे तर जगाच्या इतिहासातील आदर्श महिला राज्यकर्त्या म्हणून ओळखल्या जातात. त्यांच्या कार्याचा विविध उदाहरणांसह आढावा घेत प्रा. उखर्डे यांनी उपस्थितांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. साईनाथ गावडे यांनी तर प्रास्ताविक प्रा. बाळासाहेब गावडे यांनी केले. जय मल्हार ग्रुपच्या युवा कार्यकर्त्यांनी आयोजित केलेल्या या कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी उपस्थितांनी त्यांच्या कार्याचा आदर्श घेऊन समाजसेवा, शिक्षण आणि संस्कार यांना प्राधान्य देण्याचा संकल्प केला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री केशव गावडे ,बबन घोंगडे ,श्री नवनाथ बोंबले ,नवनाथ खंडागळे ,अंकुश झिंगरे ,रविराज गावडे , राज गावडे सदा गावडे नितीन खंडागळे विजय रानमाळ मोहन झिंगरे ,कल्याण तवले दत्ता खंडागळे ,भास्कर झिंगरे, सुनील काटमोरे अरुण शेजाळ व युवक,महिला तसेच विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी उपस्थित मान्यवरांचे स्वागत व आभार प्रदर्शन जय मल्हार ग्रुपच्या वतीने करण्यात आले.

# गाईला 'राष्ट्रीय पशू' घोषित करा; कत्तलखाने व मांस निर्यात बंदीच्या मागणीसाठी सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने :- डॉ .गणेश ढवळे

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी)** - देशहिताला सर्वोच्च प्राधान्य देत धार्मिक व सामाजिक सलोखा जपण्यासाठी गाईला "राष्ट्रीय पशू" घोषित करावे, देशातील कत्तलखाने सरसकट बंद करावेत, विदेशात होणाऱ्या मांस निर्यातीवर संपूर्ण बंदी घालावी तसेच गोवंश हत्याबंदीच्या नावाखाली निर्माण होणाऱ्या सामाजिक तेढीच्या घटनांवर संविधान व कायद्याच्या चौकटीत प्रभावी नियंत्रण आणावे, अशा प्रमुख मागण्यांसाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी सोमवारी दिनांक ८ जून-२०२६ रोजी सकाळी - ११:३० वाजता बीड जिल्हाधिकारी



कार्यालयासमोर निदर्शने करण्याचा इशारा दिला आहे. या संदर्भात जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत पंतप्रधान, केंद्रीय गृहमंत्री आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांना लेखी निवेदन पाठविण्यात आले आहे. या निवेदनात पुढे म्हटले आहे की, गोवंश हत्याबंदी कायद्याच्या अंमलबजावणीच्या नावाखाली देशातील काही ठिकाणी सामाजिक तणाव निर्माण होत असल्याचे दिसून येत आहे. अशा घटनांमुळे समाजात अविश्वास आणि तेढ निर्माण होण्याची शक्यता वाढत असून, कोणत्याही समाज घटकाला लक्ष्य न करता कायद्याची समान व निष्पक्ष अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. तसेच मांस व्यवसाय आणि मांस निर्यात क्षेत्रात कार्यरत असलेल्या मोठ्या उद्योगांबाबतही एकसमान धोरण अवलंबावे, अशी मागणी करण्यात आली आहे. शेतकऱ्यांच्या अर्थकारणाचा विचार करून पशुधन व्यवस्थापनाबाबत ठोस राष्ट्रीय धोरण आखण्याची गरज असल्याचे ही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

**सामाजिक सलोखा, कायद्याचे राज्य आणि सर्व नागरिकांना समान न्याय या तत्त्वांच्या आधारे शासनाने या विषयावर व्यापक चर्चा करून योग्य तो निर्णय घ्यावा. आणि या मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी सोमवार दिनांक ८ जून रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात येणार आहेत.**
**डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर**
**(सामाजिक कार्यकर्ते)**

# मांडणा ग्रामपंचायतीचा स्तुत्य उपक्रम ; स्वखर्चाने टँकरद्वारे भागवली भावसिग वाडीची तहान

**दैनिक युवक आधार**
**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : उन्हाळ्याच्या वाढत्या तीव्रतेमुळे ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याची समस्या गंभीर बनली आहे. मात्र, अशा प्रतिकूल परिस्थितीत सामाजिक बांधिलकी जपत सिल्लोड तालुक्यातील

मांडणा ग्रामपंचायतीने पुढाकार घेतला असून, स्वखर्चाने पाण्याचा टँकर सुरू करून भावसिग वाडी (महादेव वाडी) येथील नागरिकांची तहान भागवली आहे. ग्रामपंचायतीच्या या लोकहितकारी निर्णयाचे परिसरातून कौतुक होत आहे. मांडणा ग्रामपंचायत हद्दीपासून सुमारे तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या भावसिग वाडी येथे २५ घरांची वस्ती आहे. मागील काही दिवसांपासून या परिसरात पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली होती.



परिसरातील विहिरी आणि जलस्रोत कोरडे पडल्याने नागरिकांना पाण्यासाठी दूरवर पायपीट करावी लागत होती. यामुळे महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांची मोठी गैरसोय होत होती.

या समस्येबाबत वाडीतील नागरिकांनी ग्रामपंचायतीकडे निवेदनाद्वारे पिण्याच्या पाण्याची तातडीने व्यवस्था करण्याची मागणी केली होती. नागरिकांची अडचण आणि पाण्याची गंभीर परिस्थिती लक्षात घेऊन, मांडणा ग्रामपंचायतीने कोणत्याही शासकीय अनुदानाची किंवा मदतीची वाट न पाहता, लोकवर्गणी व स्वखर्चातून टँकर सुरू करण्याचा निर्णय घेतला.सध्या ग्रामपंचायतीच्या माध्यमातून नियमितपणे टँकरद्वारे भावसिग वाडी येथे शुद्ध व पुरेसे पिण्याचे पाणी पोहोचविले जात आहे. यामुळे वाडीतील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून, पाण्यासाठी होणारी वणवण थांबली आहे.

"जनतेची गरज ओळखून तातडीने उपाययोजना करणे हीच खरी लोकसेवा आहे," अशी भावना यावेळी उपस्थित ग्रामस्थांनी व्यक्त केली.या उपक्रमाच्या वेळी भाजप भवन मंडळाध्यक्ष एकनाथ हिवाळे, माजी उपसरपंच समाधान लोखंडे, पांडुरंग हिवाळे, विजय लोखंडे, अशोक लोखंडे, सुभाष लोखंडे, गजानन लोखंडे, सुरेश लोखंडे आदींसह ग्रामस्थ आणि सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

# बौद्ध समाजाच्या राष्ट्रीय समन्वयाची धुरा डॉ. प्रशांत इंगळे यांच्या खांद्यावर; एआयसीसी अल्पसंख्याक विभागाची महत्त्वपूर्ण नियुक्ती

**दैनिक युवक आधार**
**मुंबई / प्रतिनिधी** : देशात संविधान, सामाजिक न्याय आणि बहुजन समाजाच्या हक्कांवर सातत्याने होत असलेल्या राजकीय हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसने बौद्ध समाजाशी थेट संवाद साधण्यासाठी मोठे पाऊल उचलले आहे. आंबेडकरी चळवळीतील अभ्यासक, मुंबई विद्यापीठाचे माजी सिनेट सदस्य आणि सामाजिक कार्यकर्ते डॉ. प्रशांत रमेश इंगळे यांच्यावर अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या (एआयसीसी) अल्पसंख्याक विभागाने राष्ट्रीय पातळीवरील महत्त्वाची जबाबदारी सोपविली आहे.

नवी दिल्ली येथे झालेल्या एआयसीसी अल्पसंख्याक विभागाच्या राष्ट्रीय कार्यकारिणी बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. राज्यसभा खासदार




आणि विभागाचे राष्ट्रीय अध्यक्ष इम्रान प्रतापगढी यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या बैठकीत देशातील बौद्ध, दलित, ओबीसी, भटके-विमुक्त, अल्पसंख्याक आणि इतर वंचित घटकांना एकत्र आणण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

डॉ. इंगळे यांची "भारतातील बौद्ध समाज आणि जगभरातील बौद्ध विद्वानांशी समन्वय व संवाद संयोजक" म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. देशभरातील धम्म संघटना, बौद्ध संशोधक, सामाजिक संस्था आणि आंतरराष्ट्रीय बौद्ध विद्वान यांच्याशी समन्वय साधण्याची जबाबदारी त्यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. मुंबई मराठी पत्रकार संघ येथे आयोजित पत्रकार परिषदेत डॉ. इंगळे यांनी केंद्र सरकारवर अप्रत्यक्ष टीका करत युवकांना थेट संदेश दिला.

"देशातील युवकांच्या डोळ्यांवर मोदींच्या नावाची जी पट्टी बांधली गेली आहे, ती काढण्याची वेळ आता आली आहे. बेरोजगारी, महागाई, शिक्षणातील असमानता आणि संविधानिक संस्थांवरील दबाव या वास्तवाकडे युवकांनी डोळसपणे पाहिले पाहिजे," असे ते म्हणाले.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानिक विचारांपासून प्रेरणा घेत देशातील वंचित समाजघटकांना एकत्र आणण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. छत्रपती शिवाजी महाराजांचे लोककल्याणकारी स्वराज्य, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज, संत गाडगेबाबा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

या पत्रकार परिषदेला अहमद खान, फरहान आझमी, जीनल गाला, अहमद इक्बाल, निलेश पवार, राजेंद्र मीना, महेंद्र ठोंबरे, आसामचे प्रभारी इक्बाल अहमद सिद्दिकी, मोहम्मद अहमद कादरी यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

दरम्यान, ५ आणि ६ जून रोजी नवी दिल्ली येथे होणाऱ्या एआयसीसी अल्पसंख्याक विभाग आणि मागासवर्गीय विभागाच्या संयुक्त राष्ट्रीय अधिवेशनात सामाजिक न्याय, संविधान संरक्षण, युवकांचे प्रश्न, शिक्षण आणि रोजगार या विषयांवर देशव्यापी रणनीती आखली जाणार आहे. डॉ. इंगळे यांच्या नियुक्तीमुळे बौद्ध समाजाचा राष्ट्रीय स्तरावरील आवाज अधिक बुलंद होणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

# मेंडका येथील कै. महादाबाई दत्ता बीदमवाड यांचे दु:खद निधन

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी : प्रकाश गवारे** : मुदखेड तालुक्यातील मेंडका येथील रहिवासी कै. महादाबाई दत्ता बोदमवाड यांचे गुरुवार दि. ०४ जून २०२६ रोजी सकाळी ०८:४५ वाजता दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने बीदमवाड परिवारासह संपूर्ण गावावर शोककळा पसरली आहे.त्यांच्या पार्थिवावर दि. ०४जून २०२६ रोजी गुरुवारी सायंकाळी ०५:०० वाजता मेंडका येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. कै. महादाबाई बोदमवाड या शांत, प्रेमळ व कुटुंबवत्सल स्वभावाच्या होत्या. त्यांच्या निधनाने कुटुंबीय, नातेवाईक व गावकऱ्यांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे."सहवास जरी सुटला, स्मृती सुगंध देत राहील... जीवनाच्या प्रत्येक



वळणावर आठवण तुमची येत राहील..."भावपूर्ण श्रद्धांजलीईश्वर दिवंगत आत्म्यास चिरशांती देवो व त्यांच्या कुटुंबीयांना हे दुःख सहन करण्याची शक्ती प्रदान करो, हीच प्रार्थना.

**शोकाकुल : समस्त बोदमवाड परिवार व गावकरी मंडळी, मेंडका ता. मुदखेड. भावपूर्ण श्रद्धांजली..**

# कळंबोलीत उघड्यावर कचरा टाकणाऱ्याला बसला भुर्दंड पालिकेच्या कर्मचाऱ्यांना शिवीगाळ केल्याने आरोपी पोलिसांच्या स्वाधीन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल , ( वार्ताहर ) :** शहरात स्वच्छता राखण्यासाठी आणि उघड्यावर कचरा टाकणाऱ्यांना शिस्त लावण्यासाठी प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला आहे. आज, गुरुवार दिनांक ४ जून २०२६ रोजी कळंबोली प्रभाग क्र. १० मधील 'केएलई (KLE) कॉलेज कॉर्नर' येथे उघड्यावर कचरा टाकणाऱ्या एका बेजबाबदार नागरिकावर दंडात्मक कारवाई करण्यात आली. मात्र, कारवाई दरम्यान या व्यक्तीने पालिका कर्मचाऱ्यांना वाईट



शब्द वापरून हुज्जत घातल्याने त्याला थेट पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मुख्य आरोग्य निरीक्षक अरुण कांबळे यांच्या मार्गदर्शनानुसार कचरा टाकणाऱ्यांवर लक्ष ठेवण्यासाठी आणि कारवाई करण्यासाठी पालिकेचे पथक तैनात होते. दरम्यान, केएलई कॉलेज कॉर्नर परिसरामध्ये कचरा टाकत असताना संबंधित व्यक्तीला पथकाने रंगेहात पकडले आणि नियमानुसार त्याला फाईन (दंड) ठोठावला. दंडाची कारवाई करत असताना संबंधित व्यक्तीने प्रशासकीय कामात अडथळा आणत उपस्थित कर्मचाऱ्यांशी वाद घातला आणि अत्यंत वाईट शब्द (शिवीगाळ) वापरले. शासकीय कर्मचाऱ्यांशी गैरवर्तन केल्याप्रकरणी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून स्वच्छता पथकाने तात्काळ पोलिसांशी संपर्क साधून त्या व्यक्तीला पोलिसांच्या स्वाधीन केले. या धडक कारवाई दरम्यान स्वच्छता निरीक्षक दिग्नेश भोईर, साईगणेश सुपरवायझर रसूल बागवान आणि प्रवीण पाटील हे प्रत्यक्ष घटनास्थळी उपस्थित होते. कळंबोली परिसरातील स्वच्छता राखण्यासाठी नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे, उघड्यावर कचरा टाकू नये, अन्यथा अशाच प्रकारची कठोर दंडात्मक व कायदेशीर कारवाई पुढेही सुरू राहील, असा कडक इशारा प्रशासनातर्फे देण्यात आला आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# ५ मे आंतरराष्ट्रीय पर्यावरण दिन, कशासाठी साजरी करावा? मनुष्य खरोखर त्या योग्यतेचा आहे का?

**दैनिक युवक आधार,**
**ता. कर्जत / वैभव गायकवाड :** ५ मे हा दिवस जागतिक (अंतराराष्ट्रीय / International) स्तरावर पर्यावरण दिन म्हणून साजरा केला जातो. अनेक ठिकाणी पर्यावरण या विषयावर नवनवीन, वेगवेगळे, सामाजिक कार्यक्रम होतात. आपण आणि आपलं विज्ञान जिथंवर जाणतो की फक्त पृथ्वीवरंच जीवन, पाणी, सजीवांकारिता वायू, झाडे आणि जीवनावश्यक नैसर्गिक घटक आढळतात. आजपर्यंत असा कोणताही ग्रह वैज्ञानिकांना शोधता आला नाही, ज्या ग्रहावर जीवन आहे. शक्यता आणि तर्क खूप लावले जातात परंतु ठोस असे संकेत अजूनही मिळाले नाहीत. आपल्या धरणी मातेजवळ अनेक संसाधने आहेत. या सर्वांचा अतिवापर होऊ नये, जंगलांवर झालेले अतिक्रमण आणि नैसर्गिक साठ्यांचा अपव्यय टाळता यावा, या सर्व अमोल निसर्गाचे संगोपन व्हावे, निसर्गाप्रति आपण आभार प्रकट करता यावे म्हणून की काय आपण हा पर्यावरण दिवस साजरा करू लागलो.

असोत, पण नक्की आपण पर्यावरणाची योग्य ती काळजी घेतो का? निसर्गाकडून मिळणारी अमोल संपत्ती, मिळते की आपण हिसकावतो आहोत? पर्यटनाच्या नावावर अनेक जंगले दूषित का झाली? त्याची काळजी कोण घेणार? नैसर्गिक अधिवासात जगणारे सजीव लुप्त का होऊ लागले? पृथ्वीवरील निसर्ग चक्र का कोलमडू लागले आहे? असे अगणित प्रश्न आज निर्माण झाले आहेत. प्रगतीच्या नावाखाली आपण केव्हा पृथ्वीचा ऱ्हास करू लागलो हे समजलेच नाही.

वसुंधरा, पृथ्वी, ब्लू प्लॅनेट, Mother Earth, धरणी माता अशी अनेक प्रशंसाजनक आणि आदरप्रित्यर्थ नावे आपण ह्या ग्रहाला दिली आहेत. कारण ह्याचं ग्रहावर आपण जन्म घेतो, बागडतो, जगतो, आणि इकडेच आपला अंत होतो. भारतीय परंपरेत पृथ्वीला विशेष दर्जा आहे, तिच्याकरिता पावन असा श्लोक लिहिला गेला : समुद्रवसने देवि, पर्वतस्तनमण्डले । विष्णुपत्नि नमस्तुभ्यं, पादस्पर्शं क्षमस्व मे ॥ अर्थ - हे देवी! जी समुद्र रूपी वस्त्र धारण करते आणि पर्वत जिचे वक्षस्थल (स्तन मंडल) आहेत , हे भगवान विष्णु पत्नी! तूला माझा प्रणाम आहे। कृपया माझे चरण तूला स्पर्श होतं आहेत त्यामुळे तू मला क्षमा कर. इतका आदर आणि प्रेमभावना ह्या मातेबद्दल असताना आज तिची काय अवस्था झाली आहे हे फार दुःख देणारी बाब आहे. जो ग्रह आपल्याला त्याच्या कुशीत जोपासतो आपण त्याची कधीच चिंता केलेली दिसत नाही ना वर्तमानात, ना भूतकाळात. भविष्य कोणाला सांगता आले नाही परंतु अंदाज मात्र आपल्या अवतीभोवती सुरु असलेल्या घटनांनी नक्की बांधू शकतो.

चिनी दंत कथांमध्ये असे म्हटले जाते की पृथ्वीवर असलेली प्रत्येक गोष्ट ही जिवंत आहे. ते अगदी लहान रेतीच्या कणापासून ते अवाढव्य डोंगरांपर्यंत. ते लाखो वर्षांपासून ह्या पृथ्वीचे संरक्षक म्हणून ठाण मांडून आहेत आणि हजारो वर्षानंतर आपली कूस बदलतात. असे वर्णन याठिकाणी



केले आहे. माणसाने केलेली प्रगती जितकी प्रशंसक आहे, तितकाच तो ह्या पृथ्वीचा दोषी देखील आहे. प्रगतीच्या, Infrastructure च्या नावावर संपूर्ण डोंगर जमीनदोस्त करणे, हा अधिकार कोणी दिला? हे तेच डोंगर आहेत ते पर्जन्यकाळात ढगांना ओसरी देऊन ठिकठिकाणी पाऊस पडण्यास मदत करतात. अनेक झाडे-झूडूपे, प्राणी, पक्षी यांचे ते ठिकाण असतात. भारतात अनेक महान नद्या आहेत, आज त्यांची गटारे झाली आहेत. धर्माच्या नावावर त्यात प्रेत सोडली जातात, कारखान्यांचे रसायनयुक्त विषारी फेसाळ पाणी, गटारांचे सांडपाणी याच नद्यांमध्ये सर्रास सोडले जाते. ज्या पाण्यामध्ये याच वसुंधरेचे अनेक सजीव जगत असतात त्यांना विष देण्याचा अधिकार कोणी दिला? कारखान्यांचे मोठमोठाल्या धुराच्या चिमण्या ज्या वर्षाचे बाराही महिने विषारी धूर हवेमध्ये सोडत असतात, ह्याच धरणी मातेच्या आशीर्वादावर आकाशात उडणारे पक्षी त्यांना विष देण्याचा अधिकार कोणी दिला? जमिनीतील तेल साठे संपण्याच्या स्थितीमध्ये आहे, येत्या ५० ते ६० वर्षांत तेल साठे संपतील असा अंदाज आहे. ते फक्त तेल नसून ते आपल्या पृथ्वीचे रक्त आहे हे आपल्या ध्यानात का येत नाही? ज्या घटकांनी ब्रह्मांडातील प्रत्येक कण बनला आहे त्याच घटकांनी मानव शरीराची संरचना झाली आहे. जसे मानव शरीर आहे तसेच प्रत्येक ग्रह आणि त्यांची हालचाल आहे.

ही पृथ्वी फक्त माणसांची नाही तर इथल्या प्रत्येक प्राण्याची, पक्षाची, झाडांची, डोंगरांची, नदी-नाल्यांची आणि प्रत्येक कणाकणांची सुद्धा आहे. उलट आपल्यापेक्षा त्यांची जास्तच आहे कारण माणसाव्यतिरिक्त आणखी कोणीदेखील तिला हानी पोहचवत नाही. भारतामधील कोणतेही पर्यटनस्थळ पहिले तर तिथे प्लास्टिक च्या बाटल्या, वेफर ची कागदे, घाण आणि दुर्गंधी पसरलेली आपल्याला हमखास दिसेल ती मनुष्याने पसरवलेली असते. मग वर्षातून एकदा पर्यावरण दिन का साजरी करावा?

**याला उपाय तरी काय?**

पर्यावरण दिन साजरी करायचा असेल आणि येणारे भविष्य सुरक्षित ठेवायचे असेल तर आजच आपल्याला पाऊले उचलावी लागतील. नवीन जागी infra-structure न करता आहे त्याच ठिकाणी नवीन उभरावी करावी, कारखानदारांच्या रसायनयुक्त पाण्याची विल्हेवाट त्यांचीच जबाबदारी असावी, ती कोणत्याही नदी नाल्यात नसावी, वाहत्या नदीत प्रेत सोडण्यास कायद्याने बंदी असावी, पर्यटनस्थळी कचरा करणाऱ्या पर्यटकांना जबर शिक्षेची तरतूद असावी, कारखान्यातील धूर हा योग्यरित्या फिल्टर करून हवेत सोडण्यात यावा, समुद्रामध्ये प्लास्टिक बाटल्या आणि घनकचरा टाकणाऱ्यांवर कडक शासन व्हावे, जंगलाभोवती व चालू असलेली अतिक्रमणे हटवून त्यास reserve forest घोषित करणे, निसर्गाच्या सानिध्यातील सर्व सजीवांच्या रक्षणाकरिता आणखी कडक निर्बंध आणि शिक्षेची तरतूद करणे, १० वर्षे व त्यावरील अधिक वर्ष्यांच्या झाडांना कायद्याने संरक्षण देणे, झाडांची बेछूट कत्तल करणाऱ्यांना शासन करणे, अशी कठोर पाऊले आज उचलली नाही तर आपलाच नव्हे तर ह्या आपल्या धरणी मातेचाही अंत लवकरच होईल यात शंका नाही.तरी आपण आपल्या धरणी मातेची काळजी घेतली तरचं ती आपली काळजी घेऊ शकेल अन्यथा त्सुनामी, महाभूकंप, कोरोना सारखा आणखी मोठा महाप्रलय येऊन याचा उद्रेक होईल आणि सर्वच नष्ट होईल.

---

## नागपूर विभाग मराठा महा संघातर्फे नि :शुल्क उपवर वधू-वर परिचय मेळावा उत्साहात

**दैनिक युवक आधार**
**नागपूर सतीश कडू संपादक विभाग :** नागपूर विभाग मराठा महासंघाच्या वतीने स्वर्गीय शरदराव भोसले व स्वर्गीय सतीशजी गिरमकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ छत्रपती शिवाजी महाराज स्मृती सभागृह, सक्करदरा चौकात निःशुल्क उपवर वधू-वर परिचय मेळावा तसेच कमी शुल्कातील 'माझा जोडीदार' या माहिती पुस्तिकेचे विमोचन उत्साहात संपन्न झाले.

शिक्षण, प्रशिक्षण, व्यवसाय आणि नोकरीच्या निमित्ताने विवाहयोग्य मुला-मुलींचे विवाह योग्य वयात होत नसल्याने निर्माण होणाऱ्या विविध सामाजिक समस्यांच्या पार्श्वभूमीवर हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. विवाह जुळवून देण्याच्या प्रक्रियेत होणारी फसवणूक, मुला- मुलींमधील संभ्रम आणि पालकांमधील वाढती चिंता लक्षात घेऊन मराठा महासंघाने हा समाजोपयोगी उपक्रम राबविला. नागपूर विभाग मराठा महासंघाचे विभागीय अध्यक्ष नरेंद्र मोहिते यांच्या प्रमुख नेतृत्वात या मेळाव्याचे अध्यक्षस्थान महाराजा ऑफ ट्रस्ट व नागपूर संस्थापक भोसले राजघराण्याचे श्रीमंत मुधोजी राजे भोसले यांनी भूषविले. अखिल भारतीय मराठा महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेंद्रजी



कोंढरे यांच्या हस्ते 'माझा जोडीदार' या ३४० विवाहयोग्य मुला-मुलींची माहिती असलेल्या पुस्तिकेचे विमोचन करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय उपाध्यक्ष विनायक पवार, विराण डेव्हलपर्सचे प्रोप्रायटर दिलीप चव्हाण तसेच नवनिर्वाचित नगरसेवक सचिन नाईक यांची प्रमुख उपस्थिती होती. या मेळाव्यात महाराष्ट्रासह छत्तीसगड व मध्यप्रदेशातील अनेक विवाह योग्य युवक-युवती आणि त्यांचे पालक सहभागी झाले होते. विशेष म्हणजे १०२ उपवर मुला-मुलींनी व्यासपीठावर येऊन स्वतःचा सविस्तर परिचय करून दिला. स्टेजवर प्रत्यक्ष परिचय देणाऱ्या युवक- युवतींना 'शौर्य पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले.

मेळाव्याच्या यशस्वी आयोजनामागे आयोजक नरेंद्र मोहिते यांच्या दूरदृष्टीपूर्ण नियोजनासह महासंघातील पदाधिकाऱ्यांचे समर्पित योगदान असल्याचे उपस्थितांनी नमूद केले.

तीव्र उष्णतेच्या वातावरणातही हजारो समाजबांधवांच्या उपस्थितीत कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध आणि नियोजनबद्ध पद्धतीने पार पडला. पालकांसाठी उत्कृष्ट आसनव्यवस्था, तत्पर नोंदणी कक्ष आणि भोजन व्यवस्था यासाठी आयोजन समितीच्या सदस्यांनी व समाज बांधवांनी विशेष परिश्रम घेतले. आयोजन समितीत नरेंद्र मोहिते, विठ्ठलराव जावळकर, दिलीपराव सस्ते, अविनाश घोगले, संजयराव घारगे, देवेंद्र शिंदे, मोहनराव जाधव, दीपकराव बानगळे, सुशांत शिंदे, दीपकराव देशमुख, अमित सवडे, गुणवंत माने, महेश पवार, राजेंद्र चवळे, प्रविण माने, दिलीप निघडे, प्रविण सोमोसे, राजेंद्र सावंत, सुनील चोपडे (चंद्रपूर), महेंद्र तुपकर (गोंदिया), संजय मोहिते (भंडारा), अरुण जगताप, उमाकांत डुकरे (वर्धा) आदींचा समावेश होता.

'माझा जोडीदार' पुस्तिकेसाठी आर्थिक सहकार्य करणाऱ्या दानशूर समाजबांधवांचे तसेच कार्यक्रमाला उपस्थित राहिलेल्या सर्वांचे आयोजन समितीने आभार मानले. संचालन सौ. ममता भोसले व नरेंद्र मोहिते यांनी केले.

प्रास्ताविक नरेंद्र मोहिते यांनी तर आभार प्रदर्शन मोहन जाधव यांनी केले.

---

## मातीच्या ढिगारात मानवी कवटी ; जासई येथील बेकायदेशीर उत्खननाला गुन्हेगारीचे वळण!

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी :** एका बाजूला निसर्गाचा संहार करत डोंगर पोखरले जात असतानाच, आता जासईत चक्क मानवी अवशेष सापडल्याने संपूर्ण रायगड जिल्हा हादरला आहे. दादरपाडा बस स्थानकासमोरील बिअर शॉप जवळ टाकण्यात आलेल्या मातीच्या ढिगाऱ्यात एक मानवी कवटी आढळून आली आहे. या भयानक प्रकारामुळे बेकायदेशीर माती उपशाच्या मागे एखादे मोठे गुन्हेगारी रॅकेट किंवा हत्याकांडाचे रहस्य दडले असण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

जासईतील बेकायदेशीर उत्खननाला गुन्हेगारीचे वळण लागले आहे.उरण तालुक्यात सध्या कायद्याचे नियम धाब्यावर बसवून 'माती खोदा आणि पैसे कमवा' हा एकच अजेंडा राबवला जात आहे. स्थानिक माती माफियांनी जासई परिसरातील डोंगरांची अशी काही चाळण केली आहे की, आता या डोंगरांना 'खड्डा योजना' पुरस्कार देण्याची वेळ आली आहे. निसर्गाचे आणि शेतजमिनींचे कंबरडे मोडून सुरू असलेल्या या व्यवसायातून माणुसकी पुरती गाडली गेली आहे. निसर्गाच्या या 'पोस्टमॉर्टम'च्या बाजारात आता चक्क माणसांची हाडे आणि कवटी बाहेर येऊ



लागल्याने परिसरात कमालीची घबराट पसरली आहे.

धक्कादायक बाब म्हणजे भर वस्तीत आणि रस्त्याच्या कडेला मानवी शरीराचा भाग सापडूनही स्थानिक महसूल आणि पोलीस प्रशासन कमालीचे शांत आहे. सामान्य नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असताना, अधिकारी मात्र कोणतीही हालचाल करायला तयार नाहीत. या ढिम्म कारभारामुळे "भरावात माणसाची कवटी सापडते, पण प्रशासनाची कवटी का हलत नाही?" असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

यंत्रणांना 'प्रसादा'ची बाधा झाली आहे का?हा सवाल उपस्थित होत आहे.

स्थानिक सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, जासई आणि परिसरातून दररोज रात्री अप रात्री आणि दिवसाढवळ्या हजारो डंपर माती चोरून नेले जाते या अवैध वाहतुकीला राजाश्रय मिळण्यासाठी प्रति डंपर प्रसाद वाटला जात आहे एवढा मोठा गैरवावर उघड सुरू असताना वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गोपनीय शाखा, तहसीलदार नेमके कोणाच्या आशीर्वादाने डोळे झाकून बसले आहेत असा थेट आरोप आता केला जात आहे.

सापडलेली कवटी नेमकी कुठून आली यावरून आता संशयाचे धोके घडत झाले आहे हा मातीचा भराव मुंबईतील एखाद्या जुन्या पुलाच्या डेब्रिज कामातून आणला आहे की स्थानिक डोंगरातून आज कवटी सापडली उद्या मृतदेह सापडण्याची पण भीती व्यक्त होत आहे हा प्रकार केवळ पर्यावरणाचा ऱ्हास नसून गंभीर गुन्ह्याशी संबंधित असल्याने पुढील पोलिसांनी तहसीलदार यांनी मूग गिळून गप्प न बसता या प्रकरणाचा तपास सीआयडी कडे सोपवावा आणि ती कवटी कोणाची आहे याचा छडा लावावा अशी मागणी आता जनतेतून केली जात आहे.

---

## दु:खाच्या क्षणी गैरसोय नको; अतिरिक्त शववाहिकांसाठी अजय मोतीवार आक्रमक!

**दैनिक युवक आधार**
**वाशीम करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी :** वाशिम शहराचे क्षेत्रफळ आणि लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत असताना नागरिकांना आवश्यक नागरी सुविधा पुरविण्याचे मोठे आव्हान स्थानिक प्रशासनासमोर उभे राहत आहे. विशेषतः मृत व्यक्तींना अंत्यसंस्कारासाठी नेण्यासाठी उपलब्ध असलेल्या स्वर्गरथ (शववाहिका) सेवांची संख्या अपुरी पडत असल्याने नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. या गंभीर आणि संवेदनशील प्रश्नाकडे नगर परिषद प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते अजय मोतीवार यांच्या पुढाकाराने नगराध्यक्ष अनिल केंदळे यांना निवेदन सादर करण्यात आले.

शहरात एखाद्या वेळी दोन किंवा त्यापेक्षा अधिक ठिकाणी मृत्यू झाल्यास उपलब्ध असलेली शववाहिका सेवा अपुरी पडते.



**"मृत व्यक्तीच्या कुटुंबीयांवर दु:खाचा डोंगर कोसळलेला असतो. अशा वेळी शववाहिका उपलब्ध नसणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. शहराची वाढती लोकसंख्या आणि गरजा लक्षात घेता नगर परिषद प्रशासनाने अतिरिक्त स्वर्गरथ उपलब्ध करून नागरिकांना दिलासा द्यावा. मृतांच्या सन्मानाशी तडजोड होता कामा नये."**
**– अजय मोतीवार सामाजिक कार्यकर्ते**

परिणामी मृतांच्या नातेवाईकांना दीर्घकाळ प्रतीक्षा करावी लागते किंवा परिस्थितीनुसार अन्य खासगी वाहनांचा वापर करून अंत्यसंस्कारासाठी जावे लागते. दुःखाच्या प्रसंगी होणारी ही गैरसोय नागरिकांसाठी अत्यंत वेदनादायी ठरत असल्याची भावना निवेदनातून व्यक्त करण्यात आली.

सामाजिक कार्यकर्ते अजय मोतीवार यांनी हा प्रश्न केवळ सुविधेचा नसून मानवी संवेदनांशी संबंधित असल्याचे सांगितले. मृत व्यक्तींचा सन्मान राखणे आणि त्यांच्या कुटुंबीयांना

**वाढत्या लोकसंख्येमुळे स्वर्गरथांची कमतरता; मृतांच्या नातेवाईकांचा त्रास थांबविण्यासाठी नगराध्यक्ष अनिल केंदळे यांना निवेदन**

वेळेवर सुविधा उपलब्ध करून देणे ही स्थानिक स्वराज्य संस्थेची जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले. वाढत्या शहराच्या गरजेनुसार शववाहिकांची संख्या वाढविणे अत्यावश्यक झाले असून याकडे प्रशासनाने गांभीर्याने पाहण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

अजय मोतीवार यांनी शहरातील विविध भागांतील नागरिकांकडून प्राप्त झालेल्या तक्रारी आणि समस्या प्रशासनापुढे मांडल्या. अनेक वेळा शववाहिका उपलब्ध नसल्याने नागरिकांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागतो. अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी नगर परिषद प्रशासनाने अतिरिक्त स्वर्गरथ उपलब्ध करून देण्याबाबत तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली.

या निवेदनावर युवा नेतृत्व अजय मोतीवार, समाजसेवक प्रतिक कांबळे, सामाजिक कार्यकर्ते भूषण देशपांडे, ताजु ठेकेदार आणि संध्या सभादिंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्वांनी एकमुखाने शहराच्या वाढत्या गरजा लक्षात घेऊन स्वर्गरथांच्या संख्येत वाढ करण्याची मागणी केली.

नागरिकांच्या भावनांशी निगडित असलेल्या या महत्त्वाच्या विषयावर नगर परिषद प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेत लवकरात लवकर अतिरिक्त शववाहिका उपलब्ध करून द्याव्यात, अशी अपेक्षा शहरवासीयांकडून व्यक्त होत आहे.

---

## कुडे लेणी पायऱ्यांच्या संरक्षित कठड्यांची अज्ञात व्यक्तीकडून नासधूस

### अज्ञात व्यक्ती विरोधात पोलीसांनी गुन्हा दाखल करण्याची पर्यटकांची मागणी

**दैनिक युवक आधार**
**तळा / नितीन लोखंडे :.** तळा तालुक्यातील पर्यटन क्षेत्रापैकी कुडा प्राचीन लेणी पर्यटकांचे आकर्षण ठरत आहे. या ठिकाणी देश विदेशातील पर्यटक मोठ्या प्रमाणावर भेटी देत असतात. हि तळा तालुक्यासाठी अभिमानास्पद बाब आहे. लेण्यांची निर्मिती इसवी. सनाच्या पहिल्या ते दुसऱ्या शतकापर्यंत करण्यात आली. कुडा लेणी भारतीय पुरातत्व सर्व्हेक्षण विभाग संरक्षित राष्ट्रीय स्मारक असून लेण्यांमधील शिल्प, कोरीव काम पर्यटकांना, लेणी अभ्यासकांना, इतिहास तज्ज्ञांना भुरळ पाडते. कित्येक वर्ष दुर्लक्षित असलेल्या कुडा लेणीचा पर्यटन दृष्ट्या विकास व्हावा याकरिता रायगडचे खासदार सुनील तटकरे यांनी लेणीच्या विकासाच्या दृष्टिकोनातून संसदेमध्ये प्रश्न उपस्थित केले. तद्नंतर खऱ्या अर्थाने प्राचीन वारसा लाभलेल्या कुडे लेणीच्या विकासाकडे शासनाने लक्ष देण्यास सुरुवात केली. आदितीताई तटकरे पर्यटन राज्यमंत्री असताना पर्यटन विभागाच्या माध्यमातून कुडा लेणीच्या विकासाकरिता मोठ्या प्रमाणात निधी खर्च करून विकास कामे करण्यात आली. त्याबद्दल लोकप्रतिनिधींचे तसेच भारतीय पुरातत्व विभागाच्या



अधिकाऱ्यांचे पर्यटकांकडून आभार व्यक्त केले जात आहे. परंतु मागिल दोन वर्षाच्या अगोदर कुडे गावाकडून लेणी कडे येणाऱ्या रस्त्याची अवस्था अतिशय दयनीय होती. त्यामुळे शासनाने लाखों रुपये खर्चून पर्यटकांच्या सोयीकरता पायरी मार्ग बांधण्यात आला. परंतु पायरी मार्गावरील संरक्षित कठड्याचा मधला एक - एक दगड अज्ञात व्यक्तीकडून जाणून बुजून पाडण्यात आला आहे. हा दगड एप्रिल महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापासून एक एक करून पाडण्यात आला असल्याचे दिसून येत आहे. ज्यामुळे संरक्षित कठडा कमजोर होऊन पायऱ्यांच्या संरक्षित कठड्यांचे नुकसान होऊ शकते. संपूर्ण कठडा कोलमडून पडू शकतो. शासनाचे लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान होऊ शकते. असे कृत्य करणाऱ्या अज्ञात व्यक्ती विरोधात भारतीय न्याय संहिता कलम 324 (3) नुसार सार्वजनिक शासकीय मालमत्तेचे नुकसान, तोडफोड केल्याप्रकरणी पोलीस प्रशासनाने गुन्हा दाखल करून त्या व्यक्तीचा शोध घेऊन कठोर कारवाई करावी अशी पर्यटक तसेच स्थानिक नागरिकांची मागणी जोर धरू लागली आहे.

# अजय चव्हाण यांच्या 'भाववेली' काव्यसंग्रहाचे ५ जून रोजी प्रकाशन

**दैनिक युवक आधार**

**राहुल मडावी नागपूर :** डॉ अजय चव्हाण यांच्या 'भाववेली' काव्यसंग्रहाचे प्रकाशन शुक्रवारी, ५ जून रोजी संस्कार भारती विदर्भ प्रांताच्या अध्यक्षा सौ. कांचन गडकरी यांच्या हस्ते होणार असून,महाराष्ट्र राज्याचे कला संचालक डॉ किशोर इंगळे व नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरु डॉ मनाली क्षीरसागर यांच्या विशेष उपस्थितीत दीक्षाभूमी मार्गावरील मुंडले इंग्रजी शाळेच्या सभागृहात सायंकाळी ४ वाजता हा प्रकाशन सोहळा पार पडणार आहे. डॉ अजय चव्हाण यांनी आपल्या या काव्यसंग्रहातून विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि मानवी भावभावनांवर आधारित काव्यरचना गुंफल्या आहेत. विशेष म्हणजे, हे काव्यसंग्रह केवळ शब्दांतच नाही, तर वाचकांना मंत्रमुग्ध करणाऱ्या सुंदर रेखाचित्रांसह सजवण्यात आले असून,त्यातून प्रत्येक कवितेचा भाव अधिक प्रभावीपणे मांडण्यात आला आहे.डॉ अजय चव्हाण हे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य आणि सेवासदन विद्यालयाचे मुख्याध्यापक म्हणून कार्यरत आहेत.साहित्यिक आणि रसिक श्रोत्यांनी या कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन प्रकाशक "झिरो माईल युथ फाऊंडेशन" तर्फे करण्यात आले.

# कोकण भवन येथे जेष्ठ नागरीक महामंडळाचे कार्यालय सुरु

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** जेष्ठ नागरीकांना त्यांचा वृध्दापकाळ चांगल्या तऱ्हेने घालविता यावा समाजामध्ये त्यांचे जीवन सुसहय व्हावे, शारीरीक व मानसीक आरोग्य सुस्थितीत रहावे, वृध्दापकाळामध्ये त्यांना आर्थिक बाबतीत सक्षम करणे, विमा संरक्षण, वैद्यकीय मदत मिळवुन देणे, छळ पिळवणुक, जीवीत व मालमत्तेचे संरक्षणाबाबत मदत, निवारा अपघात विमा संरक्षण इत्यादी सोई सुविधा पुरविण्यासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत शासन निर्णय क्रं. संकीर्ण -2024/प्र.क्र.111/महामंडळे दिनांक 12/09/2024 अन्वये महाराष्ट्रातील नागरीकांसाठी जेष्ठ नागरीक महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे.

सदर महामंडळाचे कार्यालय प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण मुंबई विभाग रुम नंबर-619, 6वा मजला कोकण भवन सी.बी.डी बेलापुर येथे सुरू करण्यात आले आहे.



कार्यालयाचा फोन नंबर-022-27575979 हा आहे. सदर सदर महामंडळाच्या कार्यालयात जेष्ठ नागरीकांना सामाजिक न्याय विभागाच्या जेष्ठ नागरीकांच्या विविध योजनांबाबत मार्गदर्शन केले जाते तसेच त्यांच्या विविध समस्यांचे निराकरण केले जाते. सदर महामंडळासाठी भागभांडवल म्हणुन 50 कोटी रुपये इतका निधी मंजूर करण्यात आला आहे.


अशी माहिती जेष्ठ नागरीक महामंडळाचे सहव्यवस्थापक श्री.बाळासाहेब सोळंकी यांनी दिली आहे.

# अखेर 'बाटली आडवी' झाली ; धनशक्ती हरली, महिला शक्ती जिंकली

## प्रभाग क्रमांक १ मधील महिलांचा लढा यशस्वी

**दैनिक युवक आधार**

**( यवतमाळ ) एम डी सुरोशे महागाव :** दीड महिन्यांपासून प्रलंबित असलेल्या देशी दारू दुकान व वाईन बार संदर्भातील वादग्रस्त प्रश्नाचा अखेर निकाल लागला असून, धनदांडग्यांच्या सर्व कटकारस्थानांवर मात करत महिला शक्तीने या लढाईत दणदणीत विजय मिळविला आहे. प्रभाग क्रमांक १ मधील देशी दारूचे दुकान आणि वाईन बार बंद करण्याचे आदेश जिल्हा प्रशासनाने निर्गमित केले आहेत. या प्रभागातील देशी दारू दुकानाचे भवितव्य ठरविण्यासाठी घेण्यात आलेले महिलांचे मतदान सदोष मतदार यादीच्या आधारे पार पडल्याचा गंभीर मुद्दा समोर आला होता. या यादीत तब्बल पाच मयत महिला मतदारांसह तीन दुबार नावे असलेल्या महिला मतदारांचा समावेश असल्याचे उघड झाले. याबाबतचा वस्तुनिष्ठ अहवाल तहसीलदार अभय मस्के यांनी जिल्हाधिकारी विकास मीना यांच्याकडे सादर केला होता. प्रभाग क्रमांक १ मध्ये नव्याने सुरू करण्यात आलेले देशी दारूचे दुकान आणि त्यालगत असलेला वाईन बार बंद करण्यासाठी नगरसेविका जयश्री नरवाडे यांच्या नेतृत्वाखाली महिलांनी तीव्र लढा उभारला होता. राज्य उत्पादन शुल्क विभाग, जिल्हा प्रशासन आणि नगरपंचायत प्रशासनाच्या वतीने १६ एप्रिल रोजी 'उभी की आडवी बाटली' याचा फैसला करण्यासाठी महिलांचे मतदान घेण्यात आले होते. मतमोजणीनंतर आडव्या बाटलीच्या




बाजूने ६९ मते, उभ्या बाटलीच्या बाजूने ७ मते तर एका मतावर अंगठ्याचा ठसा असल्याने ते मत बाद ठरविण्यात आले. त्यानंतर मतमोजणी अधिकाऱ्यांनी अंतिम निर्णयासाठी अहवाल जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठविला होता. प्रभाग क्रमांक १ मधील मतदार यादीत एकूण १४५ महिलांची नावे होती. त्यापैकी ७७ महिला प्रत्यक्ष मतदानासाठी केंद्रावर उपस्थित राहिल्या. यामध्ये ६९ महिलांनी आडव्या बाटलीच्या बाजूने, तर ७ महिलांनी उभ्या बाटलीच्या बाजूने मतदान केले. एक मत अवैध ठरले. एकूण मतदार संख्येच्या ५० टक्के म्हणजे किमान ७३ मते आडव्या बाटलीच्या बाजूने पडणे आवश्यक असल्याने, ६९ मतांवर दारू दुकाने बंद होणार नाहीत, असा प्रचार काही 'निष्ठावान कार्यकर्त्यांनी' सुरू केला होता. मात्र, मूळ मतदार यादीच सदोष असल्याचा आरोप नगरसेविका जयश्री नरवाडे यांनी करत जिल्हाधिकारी यांच्याकडे लेखी निवेदन सादर केले होते.

**आपल्या सर्वांच्या सहकार्यामुळे प्रभागाच्या सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक वातावरणाला अधिक बळ मिळाले असून, समाजहितासाठी उचललेले हे पाऊल निश्चितच प्रेरणादायी ठरेल.आपण दिलेल्या अमूल्य सहकार्याबद्दल पुन्हा एकदा सर्वांचे मन:पूर्वक धन्यवाद!**

**— संजय विजय नरवाडे**

**— जयश्री संजय नरवाडे,**

**जिल्हाधिकाऱ्यांचे पत्र आणि तहसीलदारांचा अहवाल ठरला निर्णायक**

मतदान प्रक्रिया राबविताना सदोष मतदार यादी वापरण्यात आली काय, तसेच यादीतील मयत व दुबार महिला मतदारांची संख्या किती आहे, याबाबत स्वयंस्पष्ट अहवाल सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी यांनी तहसीलदारांना दिले होते.यानंतर बीएलओमार्फत करण्यात आलेल्या पडताळणीत मतदार यादीतील पाच महिला मतदार मयत असल्याचे, तर तीन महिला मतदारांची नावे दुबार असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार तहसीलदारांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे सविस्तर अहवाल सादर केला. या आठ मतदारांची नावे वगळल्यानंतर मतदार यादीतील एकूण संख्या १३७ वर आली. त्यानुसार ५० टक्के मतदानाचा निकष गृहीत धरल्यास आडव्या बाटलीच्या बाजूने ६९ मते पुरेशी ठरत होती. मतदानात नेमकी ६९ मते आडव्या बाटलीच्या बाजूने पडल्याने जिल्हाधिकारी दारू दुकानांवर कारवाई करतील, अशी शक्यता व्यक्त केली जात होती. अखेर ती शक्यता खरी ठरली असून जिल्हा प्रशासनाने देशी दारू दुकान आणि वाईन बार सील करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच दारूबंदीच्या लढ्याचे नेतृत्व करणाऱ्या महिलांना संबंधित आदेशपत्र सुपूर्द करण्यात आल्याची माहिती मिळत आहे. महिलांच्या एकजुटीपुढे धनशक्ती नमली आणि प्रभाग क्रमांक १ मध्ये अखेर 'बाटली आडवी' झाली, अशी प्रतिक्रिया आता सर्वत्र उमटत आहे. महागाव नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्रमांक १ मध्ये देशी तसेच विदेशी मद्यविक्री परवाना हद्दपार करण्यासाठी प्रभागातील सर्व महिलांनी एकजुटीने व निर्धाराने लढा उभारला. या जनहिताच्या आणि समाजहिताच्या चळवळीअंतर्गत दिनांक १६ मे २०२६ रोजी "आडवी बाटली" संदर्भातील मतदान प्रक्रिया यशस्वीरित्या पार पडली.

या लढ्यात प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष स्वरूपात सहकार्य करणाऱ्या सर्व माता-भगिनी, नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, युवक, ज्येष्ठ नागरिक, पत्रकार बंधू तसेच प्रशासनातील संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन व जाहीर आभार व्यक्त करीत आहोत.

# आ. रोहित पवार यांची करंजा गावाला भेट; जेटी व पुलाच्या कामाची बोटीतून पाहणी

## पावसाळी अधिवेशनात सरकारला धारेवर धरण्याचे आश्वासन!

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी :** आमदार रोहित दादा पवार यांनी आज करंजा गावाला सदिच्छा भेट देऊन स्थानिक मच्छीमार, शेतकरी आणि ग्रामस्थांच्या विविध जळजळीत समस्यांची प्रत्यक्ष पाहणी केली. उरण नगरपालिकेच्या नगराध्यक्षा सौ. भावनाताई घाणेकर यांनी या महत्त्वपूर्ण दौऱ्याचे आयोजन केले होते.

दौऱ्याची सुरुवात करत आमदार रोहित पवार यांनी करंजा येथील प्रसिद्ध द्रोणागिरी मातेच्या मंदिराला भेट देऊन दर्शन घेतले. यावेळी मंदिराला मिळालेल्या पर्यटनाचा दर्जा आणि मंदिर परिसर सुशोभीकरणाच्या कामाबाबत त्यांनी ग्रामस्थांकडून सविस्तर माहिती घेतली.



आमदार रोहित पवार यांनी नव्याने सुरू असलेल्या करंजा खाडीतील पुलाच्या कामाची बोटीतून जात प्रत्यक्ष पाहणी केली. या पुलाच्या कामामुळे बाधित झालेल्या मच्छीमार आणि शेतकरी वर्गाला मिळणाऱ्या नुकसान भरपाईबाबत त्यांनी चर्चा केली. पुलाच्या बांधकामामुळे स्थानिक पातळीवर होत असलेल्या अन्यायाबाबत ग्रामस्थांनी त्यांच्याकडे व्यथा मांडल्या.

त्यानंतर त्यांनी 'करंजा मच्छीमार सोसायटी'च्या कार्यालयाला भेट देऊन मच्छीमार समाजाच्या समस्या जाणून घेतल्या. या बैठकीत मच्छीमारांनी खालील प्रमुख प्रश्न आमदारांसमोर मांडले: मच्छीमारी नौकांसाठी मिळणारा डिझेल कोटा आणि थकीत डिझेल परताव्याचा प्रश्न, करंजा पोर्ट आणि बंदरात मच्छीमारांना भेडसावणाऱ्या दैनंदिन अडचणी,मच्छीमार समाजाच्या गावठाण विस्ताराची बऱ्याच काळापासून प्रलंबित असलेली मागणी, मासळी खरेदी विक्री दरम्यान व्यापारी वर्गाकडून होणारी मच्छीमाऱ्यांच्या आर्थिक फसवणूक, शासनाकडून मच्छीमारांना नव्याने शेतकरी दर्जा जाहीर झाला आहे ,परंतु अद्याप पर्यंत मच्छीमार समाजाला याचा कोणताही प्रत्यक्ष लाभ मिळाला नाही.

या सर्व समस्या ऐकल्यानंतर आमदार रोहित पवार यांनी मच्छीमार व शेतकरी वर्गाला आश्वासित केले की आगामी पावसाळी अधिवेशनात करंजा पोर्ट पुलाचे काम आणि बाधित मच्छीमारांच्या सर्व प्रश्नांवर आवाज उठून सरकारला धारेवर धरले जाईल आणि हे प्रश्न मार्गी लावले जातील.

या दौऱ्याप्रसंगी सिताराम नाखवा,मार्तंड नाखवा ,के एल कोळी, रमेश भगत, भारत नाखवा, रमेश नाखवा ,जयेंद्र नाखवा, नरेश कोळी उरण नगरपालिकेचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्व नगरसेवक तसेच सामाजिक कार्यकर्ते सचिन डाऊर, कल्पेश थळी ,मधुकर थळी, काँग्रेस नेते भालचंद्र घरत, मनोहर थळी ,शैलेश डाऊर ,देवदास थळी ,मुकेश थळी, परेश म्हात्रे मोठ्या संख्येने ग्रामस्थ व मच्छिमार उपस्थित होते.

# वादळी पावसामुळे बुद्धभूमी प्रशिक्षण केंद्राचे मोठे नुकसान ; मदतीचे आवाहन







**दैनिक युवक आधार**


**मुदखेड प्रतिनिधी : प्रकाश गवारे :** मुदखेड येथील बुद्धभूमी प्रशिक्षण केंद्र, बुद्ध विहार मुदखेड येथे दि. ०३/०६/२०२६ ते दि. १३/०६/२०२६ या कालावधीत दहा दिवसीय बालसंस्कार श्रामणेर शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात एकूण १३ विद्यार्थी सहभागी झाले असून त्यांना तथागत भगवान बुद्धांच्या पवित्र विचारांचे, नैतिक मूल्यांचे व धम्मसंस्कारांचे प्रशिक्षण दिले जात आहे.दरम्यान, शिबिर सुरू असतानाच मुदखेड शहरात वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाने हजेरी लावली. अचानक आलेल्या या नैसर्गिक आपत्तीमुळे बुद्धभूमी प्रशिक्षण केंद्राच्या विहाराचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. विहाराच्या पत्र व त्याला लावलेले लोखंडी गंगल हे उडुन गेले आहे अन्य भागांचे नुकसान झाल्याने शिबिराच्या आयोजनावरही परिणाम झाला आहे.यासंदर्भात मुदखेड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी व संबंधित कर्मचाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन नुकसानीची पाहणी करावी, पंचनामा करून शासनाकडून योग्य तो मोबदला व निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच नगराध्यक्ष, सर्व नगरसेवक व लोकप्रतिनिधींनीही विहाराची पाहणी करून आवश्यक मदतीसाठी पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.दरम्यान, समाजातील सर्व धम्मबंधू-भगिनींना देखील मदतीचे आवाहन करण्यात आले आहे. "फूल नाही तर फुलाची पाकळी" या भावनेतून आर्थिक धम्मदान देऊन बुद्ध विहाराच्या पुनर्बांधणीसाठी सहकार्य करावे, असे आवाहन पुज्य भंते गगन बौद्धी यांनी केले आहे.

# विचुंबे गावाजवळ गाढी नदीला जलपर्णीचा विळखा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल , ( वार्ताहर ) :** माथेरानच्या निसर्गरम्य आणि अथांग डोंगररांगांमधून उगम पावून, विविध गावे आणि परिसराला समृद्ध करत पुढे अरबी समुद्राला जाऊन मिळणारी गाढी नदी सध्या एका अत्यंत गंभीर आणि चिंताजनक समस्येचा सामना करत आहे. पनवेल जवळील विचुंबे गावाच्या हद्दीतून वाहणाऱ्या या नदीच्या विस्तीर्ण पात्रावर गेल्या काही दिवसांत मोठ्या प्रमाणावर जलपर्णी पसरली आहे. या जलपर्णीच्या अनिर्बंध साम्राज्यामुळे नदीचे मूळ निसर्गदत्त आणि विहंगम सौंदर्य पूर्णपणे कुरूप झाले आहे. संपूर्ण नदीचे पात्र या हिरव्यागार जलपर्णीने कशाप्रकारे वेढून टाकले आहे. नदीच्या पाण्याचा प्रवाह कुठेही दिसत नसून, संपूर्ण पात्रावर जणू काही एखाद्या मोठ्या मैदानासारखा किंवा गवताळ जमिनीसारखा भास होत आहे.

वास्तविक पाहता, ज्या गावाला किंवा परिसराला नदीचे सान्निध्य लाभते, ते गाव खऱ्या अर्थाने निसर्गाने उधळण केलेले समृद्ध गाव मानले जाते. विचुंबे गावालाही गाढी नदीच्या रूपाने निसर्गाचे असेच एक अद्भूत आणि सुंदर वरदान लाभले आहे. वर्षानुवर्षे ही नदी या भागाची जीवनवाहिनी राहिली आहे. मात्र, सध्या या नदीची झालेली दुरवस्था पाहून पर्यावरणप्रेमी आणि स्थानिक नागरिकांमधून तीव्र हळहळ व्यक्त होत आहे. जलपर्णीच्या या अवाढव्य वाढीमुळे पाण्याचा नैसर्गिक प्रवाह पूर्णपणे संथ झाला आहे. संथ झालेल्या पाण्यात कचरा अडकून पडत असून, यामुळे पाण्याचा दर्जा खालावत चालला आहे. नदीतील ऑक्सिजनचे प्रमाण कमालीचे कमी होण्याची भीती तज्ज्ञांकडून व्यक्त केली जात असून, याचा थेट आणि घातक फटका नदीतील जलचरांना व माशांना बसत आहे. याशिवाय, संथ पाण्यामुळे परिसरात डासांचा प्रादुर्भाव मोठ्या



प्रमाणावर वाढला असून, डेंग्यू, मलेरिया यांसारख्या आजारांची भीती निर्माण झाली आहे, तसेच परिसरात दुर्गंधीचे साम्राज्य पसरत आहे. निसर्गाचे एवढे मोठे वरदान लाभलेल्या या गावाचे आणि नदीचे सौंदर्य अशा प्रकारे प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे नष्ट होऊ देणार नाही, अशी आक्रमक भूमिका ग्रामस्थांनी घेतली आहे. गाढी नदीचे अस्तित्व वाचवणे, तिचे प्रदूषण रोखणे आणि स्थानिक नागरिकांना या त्रासातून मुक्त करण्यासाठी तात्काळ पावले उचलली जात आहेत. या गंभीर समस्येबाबत शासनाकडे, प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे आणि संबंधित स्थानिक प्रशासकीय विभागाकडे स्वतः अधिकृतपणे लेखी पत्रव्यवहार करून हा प्रश्न तातडीने तडीस नेणार आहेत . जर प्रशासनाने यावर वेळेत कारवाई केली नाही, तर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही स्थानिक पातळीवर दिला जात आहे.सध्या उन्हाळा संपून पावसाळा अगदी तोंडावर आला आहे. पावसाळ्यात माथेरानच्या डोंगरावरून येणाऱ्या पाण्याचा वेग प्रचंड असतो. अशा वेळी जर विचुंबे गावाजवळील नदीच्या पात्रात ही जलपर्णी अशीच साचून राहिली, तर पाण्याचा निचरा होण्यास मोठा अडथळा निर्माण होऊ शकतो. पाण्याचा प्रवाह अडकल्यास नदीचे पाणी विचुंबे आणि आसपासच्या सखल भागात किंवा लोकवस्तीत शिरून पूरसदृश परिस्थिती निर्माण होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. संभाव्य धोका आणि जीवित-वित्तहानी टाळण्यासाठी, तसेच नदीचे मूळ सौंदर्य पूर्ववत करण्यासाठी शासनाने आणि संबंधित यंत्रणेने कोणतीही दिरंगाई न करता युद्धपातळीवर जलपर्णी हटवण्याची मोहीम राबवावी, अशी आग्रही आणि आर्त मागणी आता विचुंबे ग्रामस्थ, स्थानिक शेतकरी आणि पर्यावरणप्रेमींकडून केली जात आहे.

# किरणाताई गिऱ्हे यांच्या लढ्याला यश! वाशिम नगर परिषदेच्या सफाई कामगारांचे थकीत वेतन अखेर जमा

**दैनिक युवक आधार**

**वाशीम करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी** : वाशिम शहरातील स्वच्छतेचा भार खांद्यावर घेऊन दिवस-रात्र राबणाऱ्या सफाई कामगारांच्या थकीत वेतनाचा प्रश्न अखेर निकाली निघाला असून कर्मचाऱ्यांच्या खात्यात पगार जमा करण्यात आला आहे. शहर स्वच्छ ठेवणाऱ्या कर्मचाऱ्यांना वेळेवर वेतन मिळावे यासाठी वंचित बहुजन आघाडीच्या प्रदेश सदस्या किरणाताई गिऱ्हे यांनी उभारलेल्या लढ्याला यश मिळाल्याने कामगारांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. मात्र हा विजय तात्पुरता नसून भविष्यात दर महिन्याच्या १ तारखेलाच वेतन मिळावे, यासाठी संघर्ष सुरूच राहणार असल्याचे वंचित बहुजन आघाडीने स्पष्ट केले आहे.



दैनिक युवक आधार
Epaper.YuvakAadhar.In
मुख्यसंपादक : भारती संतोष आमले - 9220403509
Page 6
01 Jun 2026

**"शहर स्वच्छ ठेवणारेच उपाशी!" — सफाई कामगारांच्या वेतनासाठी वंचितचा एल्गार; नगर परिषदेला आंदोलनाचा इशारा**

दर महिन्याच्या १ तारखेलाच पगार द्या, अन्यथा नगर परिषदेसमोर तीव्र आंदोलन; किरणाताई गिऱ्हे यांचा थेट इशारा

दैनिक युवक आधार वाशीम करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी

वाशिम शहरातील रस्ते, चौक, गल्लीबोळ आणि सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ ठेवण्यासाठी अहोरात्र मेहनत घेणाऱ्या सफाई कामगारांवर आणि कचरा संकलन करणाऱ्या ट्रॅक्टर चालकांवर आज उपासमारीची वेळ आल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. नियमित वेतन मिळत नसल्याने या कामगारांच्या कुटुंबीयांना आर्थिक संकटाचा सामना करावा लागत असून, या गंभीर प्रश्नावर वंचित बहुजन आघाडीने आक्रमक भूमिका घेत नगर परिषद प्रशासनाला थेट इशारा दिला आहे.

वंचित बहुजन आघाडीच्या प्रदेश सदस्या सौ. किरणाताई गिऱ्हे यांनी मुख्याधिकारी, नगर परिषद वाशिम यांना निवेदन सादर करून सफाई कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित वेतनाचा प्रश्न तातडीने सोडविण्याची मागणी केली. शहरातील स्वच्छतेची संपूर्ण जबाबदारी पार पाडणारे कर्मचारी आणि कचरा संकलनासाठी दिवस-रात्र काम करणारे ट्रॅक्टर चालक यांचे कुटुंब त्यांच्या मासिक वेतनावर अवलंबून आहे. मात्र वेतन वेळेवर न मिळाल्याने त्यांच्या घरातील आर्थिक गणित कोलमडले असून अनेकांना रोजच्या गरजाही भागवणे कठीण झाले आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, शहरातील नागरिकांना स्वच्छ वातावरण मिळावे म्हणून हे कर्मचारी कोणत्याही परिस्थितीत आपली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडत आहेत. पाऊस असो, उन्हाळा असो किंवा इतर कोणतीही प्रतिकूल परिस्थिती असो, हे कर्मचारी शहराच्या स्वच्छतेसाठी रस्त्यावर उतरतात. मात्र त्यांच्या श्रमांचा योग्य सन्मान होत नसल्याची भावना आता तीव्र होत आहे.

सौ. किरणाताई गिऱ्हे यांनी नगर परिषद प्रशासनाला स्पष्ट शब्दांत सांगितले की, सफाई कामगार व ट्रॅक्टर चालकांचे वेतन दर महिन्याच्या १ तारखेलाच नियमितपणे अदा करण्यात यावे. वेतनासाठी कर्मचाऱ्यांना वारंवार प्रतीक्षा करावी लागणे ही अत्यंत गंभीर बाब असून प्रशासनाने याकडे संवेदनशीलतेने पाहण्याची गरज आहे.

वंचित बहुजन आघाडीने या प्रश्नावर आता संघर्षाची भूमिका घेतली असून, मागणी मान्य न झाल्यास नगर परिषद कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे येत्या काळात हा प्रश्न अधिक चिघळण्याची शक्यता निर्माण झाली असून नगर परिषद प्रशासनावर दबाव वाढताना दिसत आहे.

शहरातील स्वच्छता व्यवस्थेचा कणा असलेल्या कर्मचाऱ्यांना वेळेवर वेतन मिळाले नाही तर त्याचा परिणाम त्यांच्या कुटुंबांबरोबरच शहराच्या स्वच्छता व्यवस्थेवरही होऊ शकतो. त्यामुळे या प्रश्नावर तातडीने निर्णय घेण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

यावेळी वंचित बहुजन आघाडी व सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे जिल्हाध्यक्ष अभिषेक सपकाळ, स्वप्निल खांदळे, आकाश पंडित, अक्षय सपकाळ यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

"शहर स्वच्छ करणाऱ्यांच्या घरात अंधार, प्रशासन मात्र शांत!"

वंचित बहुजन आघाडीने उपस्थित केलेला हा प्रश्न केवळ वेतनाचा नसून कामगारांच्या सन्मानाचा आणि त्यांच्या कुटुंबाच्या जगण्याचा असल्याचे सांगितले जात आहे. शहराला स्वच्छ ठेवणाऱ्या हातांना वेळेवर मोबदला मिळाला नाही तर प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण होणार असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. आता नगर परिषद प्रशासन या मागणीवर काय भूमिका घेते, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

## "शहर स्वच्छ ठेवणारेच उपाशी!" — वंचित बहुजन आघाडीच्या आक्रमक पाठपुराव्याला यश; दर महिन्याच्या १ तारखेलाच वेतन देण्याची मागणी कायम!

**"सफाई कामगारांचे वेतन वेळेत मिळावे यासाठी प्रशासन कटिबद्ध असून थकीत वेतनाचा प्रश्न प्राधान्याने सोडविण्यात आला. शहराची स्वच्छता राखणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या हितासाठी पुढेही आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल."**

**— निलेश गायकवाड**
**मुख्याधिकारी, नगर परिषद वाशिम**

**सफाई कामगारांच्या वेतनाचा प्रश्न हा केवळ पैशांचा विषय नाही, तर तो त्यांच्या सन्मानाचा, श्रमांच्या मूल्याचा आणि कुटुंबाच्या जगण्याचा प्रश्न आहे. शहरातील नागरिकांना स्वच्छ आणि आरोग्यदायी वातावरण देणाऱ्या कर्मचाऱ्यांना वेळेवर वेतन मिळणे हा त्यांचा हक्क आहे. थकीत वेतनाच्या मागणीला यश मिळाले असले तरी दर महिन्याच्या १ तारखेलाच वेतन देण्याची मागणी पूर्ण होते का, याकडे आता संपूर्ण वाशिमकरांचे लक्ष लागले आहे.**

**— किरणाताई गिऱ्हे**
**प्रदेश सदस्या, वंचित बहुजन आघाडी वाशिम**

वाशिम नगर परिषदेत कार्यरत असलेले सफाई कर्मचारी आणि कचरा संकलनासाठी कार्यरत ट्रॅक्टर चालक हे शहराच्या स्वच्छता व्यवस्थेचा कणा मानले जातात. पहाटेपासून रस्ते, चौक, बाजारपेठा, गल्लीबोळ आणि सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता राखण्यासाठी हे कर्मचारी सातत्याने परिश्रम घेत असतात. पाऊस, ऊन, थंडी किंवा कोणतीही प्रतिकूल परिस्थिती असो, नागरिकांना स्वच्छ आणि निरोगी वातावरण मिळावे यासाठी ते निष्ठेने काम करतात. मात्र अशा कर्मचाऱ्यांनाच वेळेवर वेतन मिळत नसल्याने त्यांच्या कुटुंबीयांवर आर्थिक संकट कोसळले होते.

घरखर्च, मुलांचे शिक्षण, वैद्यकीय उपचार, बँकेचे हप्ते आणि दैनंदिन गरजा भागवताना अनेक कर्मचाऱ्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. शहर स्वच्छ ठेवणाऱ्या हातांवर उपासमारीची वेळ येणे ही अत्यंत दुर्दैवी बाब असल्याचे मत व्यक्त होत असतानाच किरणाताई गिऱ्हे यांनी हा प्रश्न लावून धरला.

यासंदर्भात त्यांनी मुख्याधिकारी, नगर परिषद वाशिम यांना निवेदन देऊन सफाई कामगार आणि ट्रॅक्टर चालकांचे थकीत वेतन तातडीने अदा करण्याची मागणी केली होती. शहराच्या स्वच्छतेसाठी आयुष्य झिजवणाऱ्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या श्रमाचा मोबदला वेळेवर मिळणे हा त्यांचा मूलभूत अधिकार असल्याचे त्यांनी निवेदनात नमूद केले होते. तसेच कामगारांच्या कुटुंबांचा उदरनिर्वाह पूर्णपणे त्यांच्या मासिक वेतनावर अवलंबून असल्याने प्रशासनाने संवेदनशीलता दाखवून त्वरित निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली होती.

या प्रश्नावर वंचित बहुजन आघाडीने आक्रमक भूमिका घेतल्यानंतर प्रशासनावर दबाव वाढला आणि अखेर सफाई कामगारांच्या थकीत वेतनाचा प्रश्न मार्गी लागला. विशेष म्हणजे मुख्याधिकारी निलेश गायकवाड यांनीही या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेत संबंधित प्रक्रिया गतीमान करण्यासाठी सकारात्मक भूमिका बजावली. प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्यातील समन्वयातून हा प्रश्न निकाली निघाल्याने कर्मचाऱ्यांच्या खात्यात वेतन जमा होऊन अनेक कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला आहे.

मात्र, केवळ थकीत वेतन अदा करून हा प्रश्न संपणार नसल्याचे किरणाताई गिऱ्हे यांनी स्पष्ट केले आहे. त्यांनी प्रशासनाला इशारा देताना सांगितले की, सफाई कामगार आणि ट्रॅक्टर चालकांचे वेतन दर महिन्याच्या १ तारखेलाच नियमितपणे अदा करण्यात यावे. कामगारांना प्रत्येक महिन्यात त्यांच्या हक्काच्या वेतनासाठी संघर्ष करावा लागणे ही प्रशासनासाठी लाजिरवाणी बाब आहे. भविष्यात वेतन वितरणात पुन्हा विलंब झाल्यास नगर परिषद कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.

शहरातील स्वच्छता व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी कामगारांचे मनोबल उंचावणे आवश्यक आहे. त्यासाठी वेळेवर वेतन देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. अन्यथा त्याचा परिणाम केवळ कामगारांच्या कुटुंबांवरच नव्हे तर संपूर्ण शहराच्या स्वच्छता व्यवस्थेवर होऊ शकतो. त्यामुळे या प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढून वेतन वितरणाची शाश्वत यंत्रणा उभारण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

या आंदोलनात वंचित बहुजन आघाडी व सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे जिल्हाध्यक्ष अभिषेक सपकाळ, स्वप्निल खांदळे, आकाश पंडित, अक्षय सपकाळ यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला होता.

# ओबीसींच्या जातीनिहाय जनगणनेसाठी संघर्ष तीव्र; "राजपत्र निघाल्याशिवाय माघार नाही" – सचिन राजूरकर

**दैनिक युवक आधार**

**रोशन खोब्रागडे लाखनी:** ओबीसी समाजाची जातीनिहाय जनगणना करण्याच्या मागणीसाठी भंडारा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सुरू असलेल्या उपोषण आंदोलनाला दिवसेंदिवस अधिक बळ मिळत असून, आंदोलनाने आता निर्णायक टप्पा गाठला आहे. मागील २४ दिवसांपासून सुरू असलेल्या या आंदोलनाला भेट देत राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे महासचिव सचिन राजूरकर यांनी सरकारला कडक इशारा दिला आहे.




"जोपर्यंत ओबीसींच्या जातीनिहाय जनगणनेबाबत सरकार राजपत्र प्रकाशित करत नाही, तोपर्यंत आमचा संघर्ष थांबणार नाही. कोणत्याही दबावाला बळी न पडता आम्ही लढा सुरू ठेवू आणि राजपत्र निघाल्याशिवाय माघार घेणार नाही," अशी ठाम भूमिका सचिन राजूरकर यांनी व्यक्त केली.

उपोषणस्थळी उपस्थित ओबीसी बांधवांशी संवाद साधताना त्यांनी सांगितले की, ओबीसी समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक स्थितीचे वास्तव समोर आणण्यासाठी जातीनिहाय जनगणना अत्यावश्यक आहे. सरकारने वारंवार आश्वासने दिली, मात्र प्रत्यक्षात कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे आता ओबीसी समाज रस्त्यावर उतरून आपल्या हक्कांसाठी संघर्ष करत आहे.

राजूरकर पुढे म्हणाले की, "सरकारने तातडीने राजपत्र काढून ओबीसी समाजाच्या मागणीला न्याय द्यावा. अन्यथा राज्यभर असहकार आंदोलन उभारले जाईल. गरज पडल्यास दिल्लीतील रामलीला मैदानावर भव्य जनआंदोलन छेडले जाईल."

या प्रसंगी अध्यक्षीय मार्गदर्शन करताना सदानंद इलमे यांनी आंदोलनकर्त्यांच्या एकजुटीचे कौतुक केले. यावेळी प्रभाकर वैरागडे, भागीरथ धोटे तसेच 'ओबीसी योद्धा' पुरुषोत्तम टोंगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. बाळकृष्ण सार्वे यांनी केले. सूत्रसंचालन रोशन उरकुडे यांनी तर आभार प्रदर्शन के. झेड. शेंडे यांनी केले.

भंडारा जिल्ह्यातील विविध भागांतून ओबीसी बांधवांचा वाढता प्रतिसाद या आंदोलनाला मिळत असून, दिवसागणिक उपोषणस्थळी गर्दी वाढत आहे. त्यामुळे प्रशासन आणि सरकारवर दबाव वाढत असल्याचे चित्र दिसून येत आहे. ओबीसींच्या जातीनिहाय जनगणनेच्या मागणीवर सरकार कोणती भूमिका घेते, याकडे आता संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# निफाडच्या ९६ ग्रामपंचायतींमध्ये निवडणुकीचे बिगुल; आरक्षण सोडतीने इच्छुकांची धाकधूक वाढली!

## १० ते १२ जूनदरम्यान विशेष ग्रामसभा; प्रभागनिहाय आरक्षणावर गावागावांत राजकीय गणिते सुरू

**दैनिक युवक आधार**

**निफाड राजेश भडांगे तालुका प्रतिनिधी** : निफाड तालुक्यातील ९६ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या प्रक्रियेला वेग आला असून प्रभागनिहाय आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर होताच ग्रामीण भागातील राजकीय वातावरण तापू लागले आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार १० ते १२ जूनदरम्यान विशेष ग्रामसभांमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग तसेच महिलांसाठीच्या जागांची आरक्षण सोडत काढली जाणार आहे.

यासंदर्भात तहसीलदार विशाल नाईकवाडे यांनी आदेश जारी केले असून विशेष ग्रामसभांसाठी कोरमची आवश्यकता नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे निर्धारित तारखांनाच आरक्षण प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे.

आरक्षण सोडतीमुळे विद्यमान सदस्य, माजी पदाधिकारी तसेच निवडणूक लढविण्यास इच्छुक असलेल्या नव्या चेहऱ्यांची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. आपला प्रभाग कोणत्या वर्गासाठी आरक्षित होणार यावर अनेकांचे राजकीय भविष्य अवलंबून असल्याने गावागावांत गुप्त बैठका, पॅनेल निर्मिती आणि उमेदवारांची चाचपणी सुरू झाली आहे.

निफाड तालुक्यातील विष्णुनगर, गोळेगाव, शिरवाडे वाकद, वाकद, विंचूर, लासलगाव, पिंपळगाव नजीक, सायखेडा, उगाव, गोंदेगाव, दारणासांगवी, कोळगाव, रसलपूर यांच्यासह ९६ ग्रामपंचायतींमध्ये ही प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

आरक्षण प्रक्रिया पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी महसूल, पंचायत समिती व कृषी विभागातील अधिकाऱ्यांची अध्यक्ष अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. मंडळ अधिकारी, विस्तार अधिकारी आणि कृषी विभागातील अधिकाऱ्यांवर ही जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

असा असेल कार्यक्रम

८ जून – विशेष ग्रामसभेची नोटीस प्रसिद्ध

१० ते १२ जून – विशेष ग्रामसभेत प्रभागनिहाय आरक्षण सोडत

१७ जून – प्रारूप अधिसूचनेस जिल्हाधिकाऱ्यांची मान्यता

१९ जून – प्रारूप आरक्षण प्रसिद्धीकरण

१९ ते २५ जून – हरकती व सूचना दाखल करण्याची मुदत

३ जुलैपर्यंत – हरकतींवर अभिप्राय

८ जुलै – अंतिम अधिसूचनेस मंजुरी

१० जुलै – अंतिम प्रभागरचना व आरक्षण अधिसूचना प्रसिद्ध

आरक्षण सोडतीची तारीख निश्चित झाल्याने निफाड तालुक्यातील ग्रामपंचायत निवडणुकांचे रणशिंग फुंकले गेले असून, येत्या काही दिवसांत गावागावांतील राजकीय हालचाली आणखी वेगाने वाढण्याची चिन्हे दिसत आहेत.

# जेव्हा सामान्य शिक्षक जागा होतो... तेव्हा परिवर्तनाचा इतिहास घडतो!

**दैनिक युवक आधार**

**विदर्भ ज्योत्स्ना करवाडे संपादिका** : दहा दिवसाआधी आदरणीय शेषरावजी खाडे यांच्या ७५ वर्षाच्या निमित्ताने एक अभिष्टचिंतन सोहळा संपन्न झाला, त्यात "कृत्रिम प्रज्ञा "हे पुस्तक प्रकाशित केलं. काही अपरिहार्य कारणाने त्या कार्यक्रमाला मला जाता आलं नाही. तेव्हा काल मी त्यांना भेटायला गेलो. तेव्हा त्यांनी मला पुस्तक भेट दिले. त्या पुस्तकाच्या शेवटी लिहिले होते,"सामान्य माणूस हा खरोखरच सामान्य असतो का? नाही, तो असामान्यच असतो." असे विचार ज्येष्ठ प्रशासकीय अधिकारी व लेखक शेषरावजी खाडे यांनी त्यांच्या 'कृत्रिम प्रज्ञा' या पुस्तकाच्या मलपुष्टात मांडले आहेत. इतिहासाचा मागोवा घेतला तर हे सत्य वारंवार अधोरेखित झालेले दिसते. जगातील मोठ्या क्रांत्या, सामाजिक परिवर्तनाची आंदोलने आणि स्वातंत्र्यलढे हे सत्ताधारी, धनाढ्य किंवा प्रस्थापित वर्गाने घडवले नाहीत; ते सामान्य माणसांनीच घडवून आणले. त्यामुळे सामान्य माणूस हा समाजपरिवर्तनाचा खरा शिल्पकार आहे.

ऑक्टोबर- नोव्हेंबर २०२६ मध्ये अमरावती शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हे विचार अधिक अर्थपूर्ण वाटतात. निवडणुकीच्या मैदानात विविध क्षेत्रांतील प्रभावशाली व्यक्ती उतरल्या आहेत. कोणी मोठे संस्थाचालक आहेत, कोणी उद्योग-व्यवसायाशी संबंधित आहेत, कोणी राजकीय पक्षांचे प्रतिनिधित्व करत आहेत, तर कोणी आर्थिक ताकदीच्या बळावर निवडणुकीचे गणित मांडत आहेत. परंतु या सर्व गदारोळात एक प्रश्न दुर्लक्षित राहतो. शिक्षक मतदारसंघ हा खरोखर कोणाचा आहे? पैसा आणि प्रतिष्ठेचा की शिक्षकांच्या प्रश्नांसाठी झटणाऱ्या शिक्षकांचा?

२०२० च्या शिक्षक मतदारसंघ निवडणुकीनंतर समाजात एक वेदनादायी चर्चा सातत्याने ऐकायला मिळाली. पैशांचा मोठ्या प्रमाणावर वापर झाला, भेटवस्तूंचे वाटप झाले, अप्रत्यक्षपणे शिक्षक मतांची खरेदी झाली, अशी टीका अनेक स्तरांवर झाली. काही ठिकाणी तर "पैठणीच्या मोबदल्यात शिक्षक विकले गेले" अशी बोचरी टीकाही समाजात झाली. ही टीका योग्य की अयोग्य हा वेगळा विषय असू शकतो. परंतु या चर्चेमुळे शिक्षक समाजाच्या प्रतिमेला धक्का बसला, हे मात्र नाकारता येणार नाही.

समाज शिक्षकांकडे केवळ कर्मचारी म्हणून पाहत नाही. शिक्षक हा समाजाचा नैतिक मार्गदर्शक आहे. विद्यार्थ्यांना मूल्यशिक्षण देणारा, नागरिक घडवणारा आणि समाजाला दिशा देणारा घटक म्हणून त्याच्याकडे पाहिले जाते. त्यामुळे शिक्षकांच्या निवडणुकीत पैशाचे राजकारण, व्यवहार आणि प्रलोभने यांची चर्चा होणे ही संपूर्ण शिक्षण व्यवस्थेसाठी चिंतेची बाब आहे.

आज परिस्थिती अशी निर्माण झाली आहे की, एखादा सर्वसामान्य शिक्षक निवडणूक लढवण्याचा विचार करतो तेव्हा त्याला सर्वप्रथम विचारले जाते,"तुम्ही किती कोटी रुपये खर्च करू शकता?" हा प्रश्न केवळ त्या व्यक्तीला नाही तर संपूर्ण लोकशाही व्यवस्थेलाच विचारला गेलेला प्रश्न आहे. आयुष्यभर प्रामाणिकपणे अध्यापन करणाऱ्या शिक्षकाकडे कोट्यवधी रुपयांची संपत्ती असणे शक्य आहे का? आणि जर निवडणूक जिंकण्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च करावे लागत असतील, तर ते पैसे परत मिळविण्याचा मोह निर्माण होणार नाही का?

हा प्रश्न केवळ एका उमेदवाराचा नाही एका मतदार संघापुरता सुद्धा मर्यादित नाही. तो भविष्यातील शिक्षण व्यवस्थेचा प्रश्न आहे. पैसा खर्च करून निवडून आलेल्या नेतृत्वाकडून समाजाला पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि भ्रष्टाचारमुक्त कारभाराची अपेक्षा कशी करता येईल? निवडणूक ही गुंतवणूक आणि विजय हा नफा कमावण्याचा मार्ग बनला, तर त्याचा सर्वात मोठा फटका शिक्षण क्षेत्राला बसणार आहे.

म्हणूनच आज शिक्षक मतदारांसमोर केवळ उमेदवार निवडण्याचा प्रश्न नाही, तर स्वतःची सुरक्षितता आणि भविष्यातील शिक्षण व्यवस्थेचे संरक्षण करण्याचा प्रश्न आहे. शिक्षकांच्या समस्या कोण समजून घेतो? टप्पा अनुदानित शाळेचे प्रश्न,अनुदानित शाळांचे प्रश्न, सेवाशर्ती, जुनी पेन्शन, वेतनातील विसंगती, संस्थाचालकांचे मनमानी निर्णय, प्रशासकीय अन्याय आणि भ्रष्टाचाराविरुद्ध कोण सातत्याने लढतो? या प्रश्नांची उत्तरे शोधून मतदान करणे ही काळाची गरज आहे.

आज अनेक शिक्षक कार्यकर्ते वर्षानुवर्षे कोणत्याही पदाची अपेक्षा न ठेवता संघर्ष करत आहेत. शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, मुख्याध्यापक आणि शिक्षण संस्थांच्या प्रश्नांसाठी त्यांनी रस्त्यावर उतरून लढे उभारले. प्रशासनाचे दरवाजे ठोठावले. न्यायासाठी आंदोलने केली. या कार्यकर्त्यांकडे मोठा पैसा नसू शकतो परंतु त्यांच्याकडे प्रश्नांची जाण, संघर्षाची परंपरा आणि शिक्षकांविषयीची बांधिलकी आहे.

शिक्षक मतदारसंघातील निवडणूक ही राजकीय पक्षांची ताकद सिद्ध करण्याची स्पर्धा नसावी. ती शिक्षकांच्या स्वाभिमानाचे प्रतिनिधित्व करणारी प्रक्रिया असली पाहिजे. कोणत्याही राजकीय पक्षाची "पाटी" बनण्यापेक्षा शिक्षकांनी स्वतःची स्वतंत्र ओळख जपणे अधिक महत्त्वाचे आहे. कारण पक्षांचे हित आणि शिक्षकांचे हित नेहमीच समान असतील असे नाही. शिक्षकांची सुरक्षितता, शिक्षकांचा स्वाभिमान आणि शिक्षण व्यवस्थेचे भवितव्य यांना प्राधान्य देणारे नेतृत्व निवडणे हीच खरी लोकशाही आहे.

आज प्रत्येक शिक्षकाने स्वतःला एक प्रश्न विचारण्याची गरज आहे.आपण पैशाच्या प्रभावाला बळी पडणार आहोत की आपल्या प्रश्नांची जाणीव असलेल्या नेतृत्वाच्या मागे उभे राहणार आहोत? आपण आपल्या मताचा उपयोग व्यवहारासाठी करणार आहोत की परिवर्तनासाठी?

इतिहास सांगतो की, सामान्य माणूस जेव्हा जागा होतो तेव्हा मोठमोठी साम्राज्ये कोसळतात. त्याचप्रमाणे शिक्षक समाज एकजूट झाला, तर पैशाची ताकद, सत्तेचा दबाव आणि प्रस्थापितांची मक्तेदारी यांना तो सहजपणे पराभूत करू शकतो.

don't underestimate the power of a common man.... अमरावती शिक्षक मतदारसंघातील २०२६ ची निवडणूक ही अशाच परिवर्तनाची संधी आहे.

सामान्य शिक्षकाने असामान्य धैर्य दाखवले, तर हा विजय केवळ एखाद्या उमेदवाराचा राहणार नाही; तो शिक्षकांच्या स्वाभिमानाचा, शिक्षण क्षेत्राच्या भवितव्याचा आणि लोकशाही मूल्यांच्या पुनर्स्थापनेचा विजय ठरेल. कारण शेवटी इतिहास एकच गोष्ट सांगतो, परिवर्तनाची सुरुवात नेहमी सामान्य माणसापासूनच होते, आणि त्याचा विजय हा समाजाच्या नव्या भविष्याची नांदी ठरतो.

**प्रा. डॉ. प्रशांत विघे**
**सिनेट सदस्य,**
**संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती**
**९३२६८७७७४९**



# पर्यावरणाचा ऱ्हास की विकासाच्या नावाखाली विनाश?

दरवर्षी ५ जून रोजी जगभरात जागतिक पर्यावरण दिन साजरा केला जातो.पर्यावरणाचे महत्त्व अधोरेखित करणे,नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करणे आणि पृथ्वीच्या संवर्धनासाठी सामूहिक प्रयत्नांना चालना देणे हा या दिवसामागील उद्देश आहे.मात्र पर्यावरण दिनाच्या निमित्ताने वृक्षारोपणाचे कार्यक्रम,परिसंवाद आणि विविध उपक्रम आयोजित केले जात असले तरी प्रत्यक्षात पर्यावरणासमोरील संकट दिवसेंदिवस अधिक गंभीर होताना दिसत आहे. आज मानवाने विकासाच्या शर्यतीत निसर्गाचा इतका मोठ्या प्रमाणावर ऱ्हास केला आहे की त्याचे परिणाम संपूर्ण जगाला भोगावे लागत आहेत.गेल्या काही दशकांमध्ये औद्योगिकीकरण,शहरीकरण आणि वाढती लोकसंख्या यामुळे नैसर्गिक संसाधनांवर प्रचंड ताण निर्माण झाला आहे.जंगलांची मोठ्या प्रमाणावर तोड,डोंगरांची उत्खनने,नद्यांचे प्रदूषण,वाढते हवेतील प्रदूषण आणि प्लास्टिक कचऱ्याचा विळखा यामुळे पर्यावरणाचा समतोल ढासळत आहे. एकेकाळी स्वच्छ आणि समृद्ध असलेली नैसर्गिक परिसंस्था आता मानवी हस्तक्षेपामुळे धोक्यात आली आहे.हवामान बदल हे आजच्या काळातील सर्वात मोठे पर्यावरणीय संकट मानले जाते.पृथ्वीचे तापमान सातत्याने वाढत असून त्याचे परिणाम जगभरात दिसून येत आहेत.अनेक देशांमध्ये विक्रमी उष्णतेच्या लाटा अनुभवास येत आहेत.काही ठिकाणी अतिवृष्टीमुळे पूरस्थिती निर्माण होत आहे,तर काही भागांमध्ये तीव्र दुष्काळामुळे शेती आणि पिण्याच्या पाण्याचे प्रश्न गंभीर बनले आहेत. हिमनद्या वेगाने वितळत असून समुद्राची पातळी वाढत आहे.ही परिस्थिती भविष्यात किनारपट्टीवरील शहरांसाठी मोठा धोका ठरू शकते. भारतातही पर्यावरणीय संकटाची



तीव्रता वाढत आहे.दरवर्षी उन्हाळ्यात तापमानाचे नवे विक्रम नोंदवले जात आहेत.अवकाळी पाऊस,गारपीट,चक्रीवादळे आणि अनियमित हवामानामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे.शेती उत्पादन घटत असून अन्नसुरक्षेचाही प्रश्न निर्माण होत आहे.ग्रामीण भागापासून महानगरांपर्यंत पर्यावरणाचा प्रश्न सर्वांसाठी चिंतेचा विषय बनला आहे.मुंबईसारख्या महानगरांमध्ये विकास प्रकल्पांच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात झाडांची कत्तल केली जात आहे.काँक्रीटच्या जंगलांमुळे शहरातील हरित क्षेत्र कमी होत आहे.पावसाळ्यात नाले आणि जलवाहिन्या कचऱ्याने तुंबल्याने पूरस्थिती निर्माण होते. वायू प्रदूषणामुळे श्वसनाचे आजार वाढत आहेत.प्लास्टिक आणि इतर घनकचऱ्याच्या अयोग्य व्यवस्थापनामुळे पर्यावरणासोबतच नागरिकांच्या आरोग्यालाही धोका निर्माण होत आहे.प्लास्टिक प्रदूषण ही देखील एक गंभीर समस्या बनली आहे.प्लास्टिकचा वापर आज जीवनाचा अविभाज्य भाग झाला असला तरी त्याचे दुष्परिणाम अत्यंत घातक आहेत.प्लास्टिक सहज नष्ट होत नसल्याने ते माती, पाणी आणि सागरी पर्यावरणाचे नुकसान करते.नद्या आणि समुद्रात जाणाऱ्या प्लास्टिकमुळे जलचर प्राण्यांचे जीवन धोक्यात आले आहे.अनेक प्राणी प्लास्टिक खाल्ल्यामुळे मृत्युमुखी पडत आहेत.त्यामुळे प्लास्टिकमुक्त जीवनशैली स्वीकारणे ही काळाची गरज बनली आहे.पर्यावरणाचा प्रश्न केवळ सरकार किंवा प्रशासनाच्या प्रयत्नांनी सुटणारा नाही.यासाठी प्रत्येक नागरिकाने जबाबदारी स्वीकारणे आवश्यक आहे. पाण्याचा अपव्यय टाळणे,ऊर्जा बचत करणे, सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढविणे,प्लास्टिकचा वापर कमी करणे,कचऱ्याचे वर्गीकरण करणे आणि अधिकाधिक वृक्षारोपण करणे यासारख्या उपाययोजना प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनात अंगीकारल्या पाहिजेत.पर्यावरण संरक्षणासाठी शाळा,महाविद्यालये,स्वयंसेवी संस्था आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांनीही सक्रिय भूमिका बजावली पाहिजे.पर्यावरण संवर्धनासाठी केवळ वृक्षारोपण करून चालणार नाही,तर लावलेल्या झाडांचे संगोपन करणे तितकेच महत्त्वाचे आहे.विकास आणि पर्यावरण यांच्यात समतोल राखणारी धोरणे राबविणे आवश्यक आहे.शाश्वत विकास हीच काळाची गरज आहे.आर्थिक प्रगती करताना निसर्गाचे नुकसान होणार नाही याची काळजी घेणे ही प्रत्येक शासनाची आणि समाजाची जबाबदारी आहे. जागतिक पर्यावरण दिन हा केवळ उत्सव साजरा करण्याचा दिवस नाही,तर आत्मपरीक्षण करण्याची संधी आहे.आपण निसर्गाकडून सतत घेत आहोत,परंतु त्याला परत काय देत आहोत,हा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारण्याची गरज आहे. पर्यावरणाचा ऱ्हास हा केवळ निसर्गाचा प्रश्न नाही,तर तो मानवाच्या अस्तित्वाशी निगडित आहे.आज आपण जागे झालो नाही,तर उद्याची पिढी आपल्याला कधीही माफ करणार नाही.म्हणूनच पर्यावरणाचे संरक्षण ही काळाची गरज नसून मानवजातीच्या अस्तित्वासाठीची अपरिहार्यता आहे.निसर्ग वाचला तरच भविष्य वाचेल,आणि भविष्य वाचवायचे असेल तर पर्यावरण संवर्धनाला सर्वोच्च प्राधान्य द्यावे लागेल.

**- केतन द.भोज**
**सदस्य - मराठी वृत्तपत्र लेखक संघ,मुंबई**



## लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे यांचे मुंबईत भव्य स्मारक उभारावे : माजी आ. भीमराव धोंडे यांची मागणी



### परळीत वृक्षारोपणातून लोकनेत्याला अनोखी आदरांजली; पंकजाताई, प्रीतमताईंसह दिग्गजांची उपस्थित

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी मारुती सत्रे** : महाराष्ट्राचे लाडके लोकनेते आणि सर्वसामान्यांचा बुलंद आवाज असलेल्या स्व. गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या पुण्यतिथीनिमित्त परळी येथे आयोजित वृक्षारोपण कार्यक्रमात त्यांना अनोखी आदरांजली वाहण्यात आली. याप्रसंगी आष्टी विधानसभा मतदारसंघाचे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा माजी आमदार भीमराव धोंडे यांनी स्वतः वृक्षारोपण करून लोकनेत्याला अभिवादन केले. याच वेळी,'स्व.मुंडे साहेबांचे महाराष्ट्राची राजधानी मुंबईत भव्य स्मारक उभारण्यात यावे, अशी अत्यंत महत्त्वाची मागणी माजी आ.भीमराव धोंडे यांनी केली आहे.

स्व.मुंडे साहेबांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी आणि सामाजिक बांधिलकी जपण्याच्या उद्देशाने परळीत या स्तुत्य उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. राज्याच्या पर्यावरण, वातावरण बदल आणि पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडल्याने,संपूर्ण राज्याला यातून पर्यावरण संवर्धनाचा एक भक्कम संदेश देण्यात आला.

या भावनिक आणि विधायक कार्यक्रमाला अनेक दिग्गज नेत्यांची उपस्थिती होती. यामध्ये प्रामुख्याने पर्यावरण, वातावरण बदल आणि पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे,माजी खा.डॉ. प्रीतमताई मुंडे,आ.नमिताताई मुंदडा,भाजप जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, अक्षयभैय्या मुंदडा,

विजय गोल्हार, रामराव खेडकर, पांडुरंग नागरगोजे, रामदास बडे, संतोष हांगे, उत्तम बोडखे आदी पदाधिकारी हे उपस्थित होते.

**'मुंडे साहेबांचे विचार हाच आमचा दीपस्तंभ'**

वृक्षारोपण करताना माजी आ.भीमराव धोंडे यांनी मुंडे साहेबांसोबतच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला. ते म्हणाले, मुंडे साहेबांचे विचार आणि त्यांची कार्यपद्धती ही आम्हा सर्व कार्यकर्त्यांसाठी नेहमीच दीपस्तंभासारखी राहिली आहे.आज वृक्षारोपणाच्या माध्यमातून त्यांच्या स्मृतींना उजाळा देताना एक वेगळेच समाधान लाभत आहे. याच भावना व्यक्त करताना, त्यांनी मुंडे साहेबांच्या अफाट कार्याची आणि जनमानसातील स्थानाची महती लक्षात घेऊन मुंबई शहरात त्यांचे स्मारक व्हावे,अशी आग्रही मागणी पुण्यतिथीचे औचित्य साधून केली.या कार्यक्रमाला परळी व परिसरातील स्थानिक नागरिक, विविध पक्षांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. वृक्षारोपणाच्या या अनोख्या उपक्रमाचे सर्वच स्तरातून मोठे कौतुक होत आहे.

## माणगांव नगरपंचायत हद्दीत कचरा गोळा करणाऱ्या गाडीवर सध्या हिंदी गाणे वाजवले जाते; महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने (मनसे) यावर आक्षेप घेतला आहे

**दैनिक युवक आधार**
**रायगड प्रतिनिधी :-सचिन पवार** : महाराष्ट्रात मराठी भाषेला प्राधान्य मिळाले पाहिजे.शासकीय/नगरपंचायतीच्या गाड्यांवर हिंदी गाण्याऐवजी मराठी जनजागृतीपर गीत, पोवाडे किंवा सूचना वाजवाव्यात.यामुळे मराठी भाषेचा प्रसार होईल आणि स्थानिक लोकांना आपलेपणा वाटेल.बऱ्याच नगरपालिका/ नगरपंचायती कचरा गाडीवर "गाडी वाला आया घर से कचरा निकाल" सारखी हिंदी गाणी वाजवतात. पुणे, ठाणे, कल्याण-डोंबिवली अशा अनेक ठिकाणी मनसेने



यापूर्वीही मराठी गाण्याची मागणी केली आहे. काही ठिकाणी नगरपालिकांनी बदल करून मराठी गाणी लावली आहेत.

मनसेच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी नगरपंचायत प्रशासनाला निवेदन देऊन कचरा गाडीवरील गाणे मराठी करण्याची मागणी केली आहे.

"महाराष्ट्रात मराठीच" या भूमिकेतून ही मागणी करण्यात आली आहे. माणगांवच्या कचरा गाडीवर कोणते मराठी गाणे वाजवावे असे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे माणगांव तालुका अध्यक्ष चिमन सुखदरे यांनी माणगांव नगरपंचायत चे मुख्याध्याकारी संतोष माळी यांच्या जवळ चर्चा केली आहे.

## स्वाभिमानी रिपब्लिकन पक्ष युथ रिपब्लिकन रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांनी दिल्या हिरामण सुर्वे यांना शुभेच्छा

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी** : स्वाभिमानी रिपब्लिकन पक्ष युथ रिपब्लिकन रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे हिरामण सुर्वे फाऊंडेशन संस्था महाराष्ट्र राज्याचे हिरामण सुर्वे यांची भेट घेवून यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

कळवा येथील व्यक्ती महत्त्व आणि



हिरामण सुर्वे फाऊंडेशन संस्था महाराष्ट्र राज्य यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यासाठी स्वाभिमानी रिपब्लिकन पक्ष युथ रिपब्लिकन रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे रायगड जिल्हा कार्याध्यक्ष विजय धोत्रे पनवेल विधानसभा अध्यक्ष निलेश कांबळे आणि मयूर गायकवाड हे उपस्थित होते.

## वीज महावितरण विभागाच्या मान्सूनपूर्व कामांचा संथ वेग नागरिकांच्या जिव्हारी : गोरखनाथ धुमाळ

**दैनिक युवक आधार**
**पनवेल /प्रतिनिधी** : उन्हाळ्याच्या कडक झळा, घरांमध्ये सुट्टीसाठी आलेली मुले, वृद्ध नागरिक आणि पाहुण्यांची वर्दळ अशा परिस्थितीत डेरवली परिसरातील नागरिकांना वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्याचा मोठा फटका बसत आहे. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या वीजेच्या लपंडावामुळे नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले असून महावितरणच्या कारभाराविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, दिवसातून अनेक वेळा वीजपुरवठा खंडित होत असल्याने घरातील पंखे, शीतकरण यंत्रणा आणि अन्य विद्युत उपकरणे बंद पडत आहेत. परिणामी लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि रुग्णांना प्रचंड उकाड्याचा सामना करावा लागत आहे. वाढत्या तापमानामुळे नागरिक अक्षरशः हैराण झाले असून घराघरांतून संताप व्यक्त होत आहे.

- ■ रोजच्या वीज लपंडावाने डेरवलीकर हैराण;
- ■ महावितरणच्या कारभाराविरोधात संताप
- ■ तातडीने उपाययोजना न झाल्यास आंदोलनाचा इशारा – गोरखनाथ धुमाळ




विशेष म्हणजे मान्सून अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असतानाही महावितरणकडून सुरू असलेल्या मान्सूनपूर्व देखभाल आणि दुरुस्ती कामांचा वेग समाधानकारक

, **"नागरिकांच्या संयमाचा अंत पाहू नये. वारंवार होणारा वीजपुरवठा खंडितीचा प्रश्न तातडीने मार्गी लावला नाही, मूलभूत सुविधांकडे दुर्लक्ष खपवून घेतले जाणार नाही."**
**- गोरखनाथ धुमाळ**

नसल्याची तक्रार नागरिक करत आहेत. वारंवार होणारे तांत्रिक बिघाड, कमी दाबाचा वीजपुरवठा आणि अचानक होणारी वीज खंडिती यामुळे भविष्यात पावसाळ्यात आणखी गंभीर परिस्थिती निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

## तृणमूल काँग्रेसमधील फुटीवर शिक्कामोर्तब

### बंडखोर आमदारांची संख्या ५८, ऋतब्रत बॅनर्जी यांना पाठिंबा

**नवी दिल्ली :** पश्चिम बंगालमधील तृणमूल काँग्रेसमधील अंतर्गत बंडखोरीने बुधवारी एक अत्यंत नाट्यमय आणि निर्णायक वळण घेतले. पक्षातून हकालपट्टी करण्यात आलेले आमदार ऋतब्रत बॅनर्जी यांना टीएमसीच्या ५८ बंडखोर आमदारांनी विधिमंडळ पक्षनेते म्हणून पाठिंबा दिला आहे. या आमदारांनी आपल्या समर्थनाचे पत्र विधानसभा अध्यक्ष रथींद्र बोस यांच्याकडे सुपूर्द करून अधिकृत पक्ष आपणच असल्याचा दावा ठोकला आहे.

बंडखोर गटाने विधानसभेतील आपल्या नवीन नेतृत्वाची घोषणाही केली आहे. यामध्ये ऋतब्रत बॅनर्जी यांची विधिमंडळ पक्षनेतेपदी, तर जावेद खान, संदीपन साहा आणि श्युली साहा यांची उपनेतेपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच रघुनाथगंजचे आमदार अखरु झमान यांच्याकडे मुख्य प्रतोद पदाची जबाबदारी देण्यात आली आहे.पक्षांतर बंदी कायद्यानुसार विधानसभेत अपात्रतेची कारवाई टाळण्यासाठी मूळ पक्षाच्या एकूण आमदार संख्येपैकी किमान दोन-तृतीयांश आमदारांचा पाठिंबा असणे बंधनकारक आहे. तृणमलूमध्ये एकूण आमदार संख्या ८० असून अपात्रता टाळण्यासाठी आवश्यक संख्या ५४ आहे. बंडखोर गटाने ५४ चा आकडा पार





करत ५८ आमदारांचे संख्याबळ दाखवले असल्याने, त्यांचा दावा जर विधानसभा अध्यक्षांनी स्वीकारला, तर सभागृहात त्यांना स्वतंत्र गट म्हणून मान्यता मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

मुख्यमंत्र्यांच्या बैठकीमध्ये ममतांचे कट्टर समर्थक

असलेल्या टीएमसीमधील अंतर्गत संघर्ष अधिकच चव्हाट्यावर आला आहे. एकीकडे टीएमसीचा विधिमंडळ पक्ष अभूतपूर्व फाटाफुटीच्या उंबरठ्यावर असताना, दुसरीकडे ममता बॅनर्जींचे जुने निष्ठावंत मानले जाणारे आमदार नयना बंडोपाध्याय, कोलकाताचे महापौर फिरहाद हकीम, अशोक देब आणि कुणाल घोष यांनी नवान्न (सचिवालय) येथे झालेल्या या प्रशासकीय बैठकीला हजेरी लावली.

ममतांना नव्हे, अभिषेकला विरोध

या संपूर्ण घडामोडीत एक विशेष राजकीय संकेत पाहायला मिळाला. विधानसभा अध्यक्षांना दिलेल्या पत्रात बंडखोरांनी ममता बॅनर्जी यांचा उल्लेख 'पक्षाच्या अध्यक्षा' असाच केला आहे. याचा अर्थ, बंडखोरांचे हे युद्ध ममता बॅनर्जी यांच्या विरोधात नसून, सध्याच्या विधिमंडळ पक्षाच्या नेतृत्वाविरुद्ध आहे, असे दाखवण्याचा हा प्रयत्न आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, बंडखोर आमदारांनी स्पष्ट केले आहे की, विधिमंडळ पक्षाच्या कामकाजात त्यांना अभिषेक बॅनर्जी यांचा हस्तक्षेप आणि हुकूमशाही मान्य नाही. या बैठकीला उपस्थित असलेला एकही आमदार मंगळवारी कोलकाता येथे ममता बॅनर्जी यांनी पुकारलेल्या धरणे आंदोलनात सामील झाला नव्हता. दुसरीकडे, ममता बॅनर्जींचे निष्ठावंत मानले जाणारे शोभनदेव चट्टोपाध्याय, नयना बंडोपाध्याय, मदन मित्रा आणि कुणाल घोष यांसारख्या नेत्यांनी बंडखोरांच्या या बैठकीकडे पूर्णपणे पाठ फिरवली.

मुख्यमंत्र्यांच्या बैठकीमध्ये ममतांचे कट्टर समर्थक

पश्चिम बंगालमधील सत्ता गमावल्यानंतर तृणमूल काँग्रेस इतिहासातील सर्वात मोठ्या अंतर्गत बंडाला तोंड देत आहे. अशातच, मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांनी बुधवारी बोलावलेल्या प्रशासकीय आढावा बैठकीला ममता बॅनर्जी यांच्या अत्यंत जवळच्या मानल्या जाणाऱ्या तृणमूल काँग्रेसच्या अनेक नेत्यांनी हजेरी लावल्यामुळे राज्यातील राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. या घडामोडीमुळे विरोधी पक्ष असलेल्या टीएमसीमधील अंतर्गत संघर्ष अधिकच चव्हाट्यावर आला आहे. एकीकडे टीएमसीचा विधिमंडळ पक्ष अभूतपूर्व फाटाफुटीच्या उंबरठ्यावर असताना, दुसरीकडे ममता बॅनर्जींचे जुने निष्ठावंत मानले जाणारे आमदार नयना बंडोपाध्याय, कोलकाताचे महापौर फिरहाद हकीम, अशोक देब आणि कुणाल घोष यांनी नवान्न (सचिवालय) येथे झालेल्या या प्रशासकीय बैठकीला हजेरी लावली.